दैनिक
www.epaper.rajyaloktantra.com
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक
बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१६४ | गुरूवार दि.०३ सप्टेंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### भारताचा जीडीपी वाढ ७.८ नव्हे तर २.६ टक्के– गर्ग

दिल्लीः भारताच्या एप्रिल–जून तिमाहीतील जीडीपी वाढीचा दर ७.८ टक्के राहिला आहे. हा आकडा आरबीआयच्या ७ टक्के अंदाजापेक्षा जास्त आहे. मात्र, माजी वित्त सचिव सुभाष चंद्र गर्ग यांनी या आकडेवारीवरच प्रश्न उपस्थित केला आहे. त्यांच्या मते, काही वेगळ्या पद्धतीने आकडे पाहिल्यास जीडीपी वाढ २.६ टक्के असल्याचे दिसते. गर्ग यांच्या मते, एप्रिल–जून २०२६ या तिमाहीत भारताची जीडीपी वाढ सरकारने सांगितल्याप्रमाणे ७.८ टक्के नसून प्रत्यक्षात सुमारे २.६ टक्के आहे. सुभाष चंद्र गर्ग म्हणाले की, सरकारने एप्रिल–जून तिमाहीसाठी जाहीर केलेली ७.८ टक्के वाढ ही आकडेवारी पाहताना सावध राहण्याची गरज आहे. माझ्या गणनेनुसार, २०२५–२६ च्या एप्रिल–जून तिमाहीत जीडीपी ८६.०५ लाख कोटी रुपये होता, तर २०२६–२७ च्या याच तिमाहीत तो ८८.२७ लाख कोटी रुपये आहे. या दोन आकड्यांमध्ये झालेली वाढ पाहिली तर ती केवळ २.६ टक्क्यांच्या आसपास आहे. गर्ग यांनी पुढे म्हटले की, जीडीपी मोजण्याची नवीन मालिका लागू करण्यात आली असून, त्यासाठी आधारभूत वर्ष देखील बदलण्यात आले आहे.

### काँग्रेसच महिला आरक्षणाची खरी जनक

मुंबईः काँग्रेसने महिला आरक्षण विधेयकाला कधीही विरोध केलेला नाही, उलट काँग्रेसच महिला आरक्षणाची खरी जनक आहे, असा जोरदार पलटवार महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी केला आहे. काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्या नाशिक दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर भाजप महिला मोर्चाने केलेल्या आंदोलनावर प्रत्युत्तर देताना पृथ्वीराज चव्हाण म्हणाले, काँग्रेसने कधीही विरोध केला नाही, काँग्रेसचा महिला आरक्षणाला विरोध आहे, हे कोणत्या मूर्खाने सांगितले? २०२३ मध्ये जेव्हा केंद्र सरकारने घटनादुरुस्ती विधेयक आणले, तेव्हा काँग्रेसने त्याला पूर्ण पाठिंबा दिला होता. महिला आरक्षणाचे मूळ जनक आम्हीच आहोत, असे पृथ्वीराज चव्हाण म्हणाले. भाजपला महिला आरक्षण लागू करायचे नसून केवळ उत्तर–दक्षिण वाद निर्माण करायचा आहे आणि जनगणनेच्या नावाखाली टोलवाटोलवी करायची आहे, असे ते म्हणाले.

### काल आलेला पोरगा काहीही बोलतो–चव्हाण

मुंबईः माहिममध्ये मनसे नेते अमित ठाकरे यांच्या विरोधात भाजप युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या आंदोलनावर भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असल्याचे समजते. ''काल आलेला पोरगा बोलतो आणि आपण आंदोलन करतो, हे चुकीचे आहे. युवकांना शिक्षीत करायचे आहे, गुंड म्हणून तयार करायचे नाही,'' असे खडेबोल मुंबई कार्यकरणी बैठकीत चव्हाण यांनी युवा मोर्चाला सुनावले आहेत. पुण्यातील शासकीय महाविद्यालयाच्या कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेजवळ असलेल्या पंतप्रधान मोदी यांचा फोटोला अमित ठाकरे यांनी सोमवारी आक्षेप घेतला. त्यानंतर त्यांच्या कार्यकर्त्यांनी तो फोटो हटविला होता. या प्रकरणाचे पडसाद मंगळवारी मुंबईत उमटले होते. एकीकडे अमित ठाकरे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. तर, दुसरीकडे भाजप युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी माहिममध्ये आंदोलन केले होते. भाजप कार्यकर्त्यांनी राज ठाकरे यांच्या दादर येथील 'शिवतीर्थ' निवासस्थानाकडे जाण्याचा पवित्रा घेतल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०२ सप्टेंबर २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत


| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २८.५० क्विंटल | २,६२६ | २,८०० | २,६९४ |
| ज्वारी/हायब्रिड: ९६.५० क्विंटल | २,३०१ | ३,९०५ | ३,१३६ |
| मका/लोकल: ८.०० क्विंटल | २,४५३ | २,४५६ | २,४५४ |
| तूर : ०.५० क्विंटल | ८,००० | ८,००० | ८,००० |
| उडीद : २३.५० क्विंटल | ८,२५० | ८,२५० | ८,२५० |
| बाजरी: २२.०० क्विंटल | २,४५२ | २,७८६ | २,६२५ |
| मुग: ८.५० क्विंटल | ७,७९० | ८,७०१ | ८,२४५ |
| सोयाबीन: १९.५० क्विंटल | ५,९०० | ५,९०० | ५,९०० |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ५,१०० | ६,९०० | ६,००० |

# सीसीआयकडे 'कपास किसान' ॲपवर नोंदणी सुरू; ३१ ऑक्टोबरपर्यंत मुदत

## सात–बारा अपडेट नसल्याने कापूस उत्पादक शेतकरी अडचणीत

पुणे । प्रतिनिधी

**शेतकऱ्यांना कापसाला योग्य दर तसेच किमान आधारभूत किंमत मिळावी, यासाठी भारतीय कापूस महामंडळाने (सीसीआय) यंदाच्या कापूस खरेदीची पूर्वतयारी सुरू केली आहे. कापूस विक्रीसाठी शेतकऱ्यांची ऑनलाइन नोंदणी प्रक्रिया १ सप्टेंबर २०२६पासून 'कपास किसान' मोबाइल ॲपवर सुरू करण्यात आली असून, ३१ ऑक्टोबर २०२६पर्यंत नोंदणी करता येणार आहे. मात्र, नोंदणीसाठी सात–बारा उताऱ्यावर यंदाच्या कापूस पिकाची ई–पीक नोंद अद्ययावत असणे आवश्यक असल्याने अनेक शेतकऱ्यांसमोर अडचण निर्माण झाली आहे.**



### कापसाला ८,२६७ ते ८,६६७ रुपये हमीभाव

केंद्र सरकारने यंदाच्या कापूस हंगामासाठी किमान आधारभूत दर निश्चित केले आहेत. मध्यम धाग्याच्या कापसासाठी ८,२६७ रुपये प्रतिक्विंटल, तर लांब धाग्याच्या कापसासाठी ८,६६७ रुपये प्रतिक्विंटल असा हमीभाव आहे. खुल्या बाजारातील कापसाचे दर हमीभावापेक्षा खाली गेल्यास सीसीआयच्या खरेदी केंद्रांवर कापूस खरेदी केली जाते. त्यामुळे सीसीआयच्या केंद्रांवर कापूस विक्री करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांसाठी 'कपास किसान' ॲपवरील ऑनलाइन नोंदणी महत्त्वाची ठरणार आहे.

गतवर्षी शेतकरी स्वतः ई–पीक पाहणी करून आपल्या शेतातील पिकांची ऑनलाइन नोंद करत होते. त्यामुळे कापूस पिकाची नोंद सात–बारा उताऱ्यावर वेळेत अपडेट होत होती. मात्र, यंदापासून पीकपेरा नोंदणीची जबाबदारी नियुक्त सहायकांमार्फत केली जात आहे. अनेक गावांमध्ये अद्याप पीकपेरा नोंदणी पूर्ण झालेली नसल्याने ◀◀ पान २ वर

# ठाकरे गटाला ती चूक महागात पडणार?

## सुप्रीम कोर्टात शिंदे गटाचा जोरदार युक्तिवाद

दिल्ली । वृत्तसंस्था

शिवसेना पक्ष आणि चिन्हाच्या मालकीवरून सुरू असलेल्या कायदेशीर संघर्षाला सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीदरम्यान आता आणखी धार आली आहे. उद्धव ठाकरे गटाच्या युक्तिवादानंतर बुधवारपासून एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील गटाने आपली बाजू मांडण्यास सुरुवात केली. ज्येष्ठ वकील नीरज किशन कौल यांनी निवडणूक आयोगाच्या निर्णयाचे जोरदार समर्थन करत ठाकरे गटाच्या अनेक दाव्यांना प्रत्युत्तर दिले.

ठाकरे गटाकडून कपिल सिब्बल आणि देवदत्त कामत यांनी निवडणूक आयोग तसेच विधानसभा अध्यक्षांच्या निर्णयांवर गंभीर आक्षेप नोंदवले होते. 'धनुष्यबाण' हे चिन्ह गोठवावे, अशी मागणीही ठाकरे




गटाकडून करण्यात आली आहे. शिंदे गटाच्या वतीने या प्रकरणातील युक्तिवादाची जबाबदारी वेगवेगळ्या मुद्द्यांनुसार विभागण्यात आली आहे. नीरज किशन कौल आणि मनिंदर सिंग हे पक्षाचे अस्तित्व आणि निवडणूक चिन्हाच्या प्रश्नावर बाजू मांडत आहेत. तर आमदारांच्या अपात्रतेशी संबंधित मुद्द्यांवर सॉलिसिटर जनरल तुषार मेहता युक्तिवाद करणार आहेत. ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी हे देखील शिंदे गटाच्या बाजूने न्यायालयात ◀◀ पान २ वर

# १७ सप्टेंबरपासून बीड – पुणे तर डिसेंबरमध्ये मुंबईसाठी रेल्वे धावणार

## मराठवाडा मुक्ती संग्रामदिनी बीडच्या विकासाला नवी गती–सुनेत्रा पवार

मुंबई–बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणारी बीड – पुणे रेल्वे येत्या १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या मुहूर्तावर धावणार असून, त्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व तांत्रिक व सुरक्षाविषयक चाचण्या पूर्ण करण्यात आल्या आहेत. तसेच डिसेंबरअखेर बीड – मुंबई (पनवेल) रेल्वे सेवा सुरू



करण्याच्या दृष्टीने आवश्यक सर्व कामे युद्ध पातळीवर पूर्ण करण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी बुधवारी दिल्या.

सह्याद्री अतिथीगृह येथे अहिल्यानगर – बीड – परळी रेल्वे ◀◀ पान २ वर

# सरकारचा प्रस्ताव जरांगे यांच्या समोर; मागण्या मान्य करण्यासाठी हालचालींना वेग, पण उपोषण सुरूच!

अंबड । प्रतिनिधी

**मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे सुरू केलेल्या आमरण उपोषणाचा आज पाचवा दिवस आहे. उपोषणामुळे जरांगे यांची प्रकृती खालावत असतानाच राज्य सरकारकडून त्यांच्या मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी हालचालींना वेग आला आहे. आमदार प्रसाद लाड यांनी येऊन मनोज जरांगे पाटील यांच्याशी रात्री उशिरा सकारात्मक चर्चा केली.**

सरकारच्या वतीने जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, पोलीस अधीक्षक तेगबीर सिंग संधू आणि इतर



प्रतिनिधींनी जरांगे यांची भेट घेतली. सरकारकडून मागण्यांबाबतचा प्रस्तावही त्यांच्यासमोर ठेवण्यात आला. मात्र, ''अधिकाऱ्यांनी नव्हे तर सरकारच्या राजकीय नेतृत्वाने थेट चर्चेला यावे आणि मागण्यांवर ठोस निर्णय घेऊन जीआर द्यावा,'' अशी भूमिका जरांगे यांनी घेतली. सरकारच्या प्रस्तावात कुणबी नोंद असलेल्या मराठ्यांना प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया अधिक सुलभ करणे, जिल्हानिहाय नोडल अधिकारी नियुक्त करणे तसेच मराठा समाजाच्या विविध मागण्यांवर कार्यवाही करण्याबाबत सकारात्मक भूमिका मांडण्यात आली आहे. सरकारने ◀◀ पान २ वर

# अर्थसंकल्पातील मंजूर निधी ओबीसी मंत्रालयाला ताबडतोब द्या!

## ओबीसी मंत्रीमंडळ उपसमितीची महत्त्वपूर्ण आढावा बैठक

मुंबई । प्रतिनिधी

ओबीसींसाठी अर्थसंकल्पातील मंजूर निधी वित्त विभागाने ओबीसी विभागाला तातडीने द्यावा, अशी तंबी ओबीसी उपसमितीचे अध्यक्ष व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांना दिली. ते म्हणाले, हा निधी द्यावा असे कायदेशीर बंधन असतानाही अधिकाऱ्यांनी वेळकाढूपणा केला आहे. मंत्री छगन भुजबळ, गुलाबराव पाटील, संजय राठोड यांनी निधी विलंबावर खंत व्यक्त केल्याने,



बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांना जाब विचारला.

मंत्रालयात परिषद सभागृहात महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली ओबीसी मंत्रीमंडळ उपसमितीची महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीला मंत्री छगन भुजबळ, गुलाबराव पाटील, संजय राठोड, अतुल सावे, गणेश नाईक यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीनंतर उपसमिती अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, राज्यातील ओबीसी विद्यार्थ्यांसाठी ◀◀ पान २ वर

# दिशा सालियन मृत्यू प्रकरणाचा तपास सीबीआयकडे



मुंबई । प्रतिनिधी

अभिनेता सुशांतसिंह राजपूतची माजी मॅनेजर दिशा सालियन हिच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणाचा तपास केंद्रिय अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) वर्ग करण्याचे महत्त्वपूर्ण आदेश मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारी (दि. २ सप्टेंबर) दिले. आता या प्रकरणाचा पूर्ण तपास केंद्रीय अन्वेषण विभागाकडून केला जाणार असून, न्यायालयाने या संदर्भात एफआयआर नोंदवण्याचे स्पष्ट निर्देश सीबीआयला दिले आहेत. यासोबतच, आतापर्यंत या प्रकरणाशी संबंधित असलेली मालवणी पोलीस ठाण्यातील सर्व कागदपत्रे आणि पुरावे तात्काळ सीबीआयकडे सोपवण्याचे आदेशही उच्च न्यायालयाने दिले आहेत. या प्रकरणी दिशाचे वडील सतीश ◀◀ पान २ वर

# मराठवाडा दुष्काळाच्या छायेत; कृत्रिम पावसाचा प्रयोग तातडीने राबवा–देशमुख



लातूर । प्रतिनिधी

पावसाळ्याचे तीन महिने संपत आले असतानाही मराठवाड्यातील अनेक भागांत अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नाही. पावसाअभावी पिकांनी माना टाकल्या असून, चिंतेत असलेल्या शेतकऱ्यांचे डोळे आभाळाकडे लागले आहेत. मराठवाडा दुष्काळाच्या उंबरठ्यावर उभा असल्याने परिस्थितीची संवेदनशीलतेने दखल घेऊन या भागात कृत्रिम पावसाचा प्रयोग तातडीने राबवावा, अशी मागणी माजी आमदार धीरज देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

गेल्या तीन महिन्यांत मराठवाड्यातील अनेक भागांत अपेक्षित पाऊस झालेला ◀◀ पान २ वर


# मुंबई–कोलकाता पाण्याखाली जाणार?

## समुद्राची पातळी वाढली, हिमनद्या वितळण्याचा परिणाम; संयुक्त राष्ट्राच्या अहवालाने घबराट

दिल्ली । वृत्तसंस्था

**समुद्राच्या पातळीत झपाट्याने होणारी वाढ ही जगभरातील लोकसंख्येसाठी अत्यंत गंभीर धोक्यांपैकी एक बनली आहे. वाढत्या जलपातळीमुळे भारतातील मुंबई, कोलकाता आणि बांगलादेशातील ढाका यांसारख्या शहरांमधील लाखो लोकांच्या जीवनावर मोठे संकट घोंघावत असल्याचे संयुक्त राष्ट्रांच्या एका ताज्या अहवालात नमूद करण्यात आले आहे. हिमनद्या वितळणे आणि महासागरांचे तापमान वाढल्यामुळे समुद्राच्या पातळीत अभूतपूर्व वेगाने वाढ होत आहे.**

समुद्रसपाटीतील वाढ, आव्हाने आणि त्यावरील उपाययोजना या प्रसिद्ध झालेल्या संयुक्त राष्ट्र महासचिवांच्या अहवालानुसार, समुद्राची पातळी ◀◀ पान २ वर



### यामुळे वाढते समुद्राची पातळी...

हे प्रामुख्याने मानवनिर्मित जागतिक तापमानवाढीमुळे हिमनद्या वितळणे आणि महासागरांचे तापमान वाढणे यांचा परिणाम आहे. २०१४ ते २०२३ या काळात, जागतिक समुद्रसपाटीत दरवर्षी ४.७ मिमीने वाढ झाली. २०२४ मध्ये समुद्रसपाटीत ५.९ मिमीने वाढ झाली, ज्यामुळे एक नवीन विक्रम प्रस्थापित झाला. याचे मुख्य कारण महासागरांचे अति–तापमान वाढणे हे आहे; काही प्रदेशांमध्ये तापमान वाढीचा वेग गेल्या चार हजार वर्षांतील सर्वाधिक आहे. २०५० पर्यंत हा वेग आणखी वाढण्याची शक्यता आहे. अहवालानुसार, सुमारे ७७ कोटी लोक, जे जागतिक लोकसंख्येच्या साधारणपणे १० टक्के आहेत ते किनारपट्टीच्या भागात राहतात आणि त्यांना मोठ्या धोक्यांचा सामना करावा लागत आहे.

## अग्रलेख

# ७.८ टक्के चा जल्लोष पण गावाच्या अर्थव्यवस्थेचे काय?

उत्पादन क्षेत्र ९.२ टक्क्यांनी वाढते, वित्तीय आणि रिअल इस्टेट सेवा १२.१ टक्क्यांनी वाढतात; पण शेतीची वाढ केवळ ३.६ टक्के राहते. हा केवळ दोन आकड्यांमधला फरक नाही; हा भारताच्या विकासाच्या दिशेवरचा गंभीर प्रश्न आहे. कारण भारताची खरी आर्थिक परीक्षा मुंबईच्या शेअर बाजारात किंवा दिल्लीतील वातानुकूलित परिषदांमध्ये होत नाही. ती गावाच्या बाजारपेठेत होते. शेतकऱ्याच्या शेतात होते. कृषी मजुराच्या हाताला काम मिळते की नाही, यामध्ये होते. दूध, भाजीपाला, धान्य, कापूस, ऊस किंवा सोयाबीन विकल्यानंतर कुटुंबाच्या हातात प्रत्यक्ष किती पैसा उरतो, यात होते.

सरकार ७.८ टक्के ची आकडेवारी दाखवते. पण ग्रामीण भारताला प्रश्न पडतोमाझ्या उत्पन्नाचा वेग किती? शेतीची वाढ ३.६ टक्के आणि महागाईत अन्नपदार्थांचा दबाव कायम असेल, तर शेतकऱ्याच्या उत्पन्नाची वास्तविक क्रयशक्ती किती वाढली, याचे उत्तर द्यावे लागेल. उत्पादन खर्च वाढत असेल, बियाणे, खते, औषधे, डिझेल, वीज आणि मजुरीचा खर्च वाढत असेल आणि त्याच वेळी शेतमालाला अपेक्षित भाव मिळत नसेल, तर चा मोठा आकडा शेतकऱ्याच्या घरापर्यंत पोहोचतो तरी कसा? जीडीपी वाढीचा फायदा जर गावाच्या किराणा दुकानाच्या उलाढालीत, शेतकऱ्याच्या बचतीत आणि ग्रामीण कुटुंबाच्या खरेदीक्षमतेत दिसत नसेल, तर त्या वाढीचा सामाजिक अर्थ काय? ग्रामीण अर्थव्यवस्था ही केवळ शेती नसते. शेतकऱ्याच्या हातात पैसा आला की गावातील ट्रॅक्टर दुरुस्तीचे दुकान चालते, कृषी सेवा केंद्र चालते, छोटा व्यापारी कमावतो, बांधकामाला काम मिळते, दुग्धव्यवसायाला चालना मिळते आणि स्थानिक बाजारपेठेत पैसा फिरतो. त्यामुळे शेतीची कमकुवत वाढ ही केवळ शेतकऱ्याची समस्या नसून संपूर्ण ग्रामीण मागणीची समस्या आहे. याच ठिकाणी मोदी सरकारच्या आर्थिक मॉडेलला कठीण प्रश्न विचारावा लागतो. मोठे महामार्ग उभे राहतात, मोठे उद्योग येतात, शहरांमध्ये मेट्रो धावतात, बंदरे आणि विमानतळ विस्तारतात हे विकासाचे आवश्यक भाग आहेत, पण त्याच वेळी गावातून शहराकडे रोजगारासाठी होणारे स्थलांतर वाढत असेल, ग्रामीण तरुणाला स्थानिक पातळीवर स्थिर रोजगार मिळत नसेल आणि शेतीवरचा आर्थिक ताण कायम असेल, तर विकासाचा लाभ भौगोलिकदृष्ट्याही असमान आहे, असे म्हणावे लागेल.

एक भारत एक्सप्रेसवेवर वेगाने धावत आहे; दुसरा भारत अजूनही पिकाच्या भावाची वाट पाहत आहे. ही दरी कमी करण्याची जबाबदारी सरकारची आहे. ग्रामीण भारताला केवळ अनुदान किंवा निवडणुकीपूर्वीच्या घोषणांची गरज नाही. त्याला स्थिर कृषी उत्पन्न, बाजारपेठेपर्यंत पोहोच, साठवणूक आणि प्रक्रिया उद्योग, ग्रामीण रोजगार, सिंचन, स्वस्त कर्ज आणि स्थानिक उद्योगांना बाजारपेठ हवी आहे. शेतकऱ्याला ग्राहक म्हणून नव्हे, अर्थव्यवस्थेचा उत्पादक आणि भागीदार म्हणून पाहण्याची गरज आहे. कारण शहरातील वाढवणारी मागणी आणि गावातील खरेदीशक्ती यांचा संबंध तोडला गेला, तर अर्थव्यवस्थेची वाढ वरून चमकदार आणि खालून कमकुवत राहू शकते. म्हणूनच ७.८ टक्के च्या जल्लोषात एक प्रश्न मुद्दाम विचारला पाहिजे. या ७.८ टक्क्यांत ग्रामीण भारताचा हिस्सा किती आहे? आणि जर उत्तर केवळ शेतीच्या ३.६ टक्के वाढीत मिळणार असेल, तर सरकारने स्वतःलाच आणखी एक प्रश्न विचारला पाहिजे. भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढते आहे, की भारतातील काही क्षेत्रे वेगाने वाढत आहेत? कारण शेतकरी मागे राहिला, ग्रामीण ग्राहकाची क्रयशक्ती दबली आणि गावातील तरुण रोजगारासाठी शहरांकडे धावत राहिला, तर चा वेग कितीही मोठा असला तरी विकासाची कहाणी अपूर्णच राहणार आहे. भारताला फक्त मोठी अर्थव्यवस्था बनायचे नाही; भारतातील गावांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवायचे आहे, आणि हीच ७.८ टक्के समोरची सर्वात मोठी ग्रामीण कसोटी आहे.

## लाच घेतानी पोलीस हवालदार पकडला


जालना । प्रतिनिधी

पोलीस हवालदार भारत चव्हाण वय ४६ वर्ष बक्कल नंबर ५१२ नेमणुक-पो. स्टे. बिडकीन, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण वर्ग-३ यांनी तक्रारदार यांना १०००/-रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना यांच्या जाळ्यात अडकले, दि.०१/०९/२०२६ लेखी तक्रार दिली की, तक्रारदार यांचे कडे ०२ टाटा कंपनीचे ७०९ टिप्पर असुन सदर गाड्यामध्ये खडी, कच व विटांची वाहतूक करतात. तक्रारदार यांचा टिप्पर चालक याने दि.०१/०९/२०२६ रोजी दुपारी ०१:०० वा चे सुमारास तक्रारदार यांना फोन करून सांगितले की, मी बिडकीन येथून कच भरून एमआयडीसी पैठण येथे जात असताना शेकटा फाटा येथे पोलिसांनी गाडी थांबवून मालकास फोन लाव म्हणून सांगितले म्हणून तुम्हास फोन केला आहे. असे सांगून चालकाने पोलिसास फोन दिला त्यावेळी समोरील व्यक्तीने मी पो. स्टे. बिडकीन येथील चव्हाण पोलिस बोलतोय तुमची गाडी बऱ्याच दिवसापासून चालू असून तुला जर पो. स्टे. बिडकीन हद्दीत गाडी चालवायची असल्यास मला हप्ता द्यावा लागेल, नाही तर तुझी गाडी चालू देणार नाही. तु बिडकीन येथे येऊन मला भेट, आल्यावर हप्त्याचे किती पैसे द्यायचे ते सांगतो असे सांगितले. अशा आशयाची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र. बी. जालना कडे दिली. तक्रारीची पडताळणी तक्रारदार यांचे कडून तक्रारदार हे पत्रकार असल्यामुळे २ गाड्यांपैकी १ गाडीची सुट देऊन उर्वरीत १ गाडीचे १,०००/- रु महिना हप्ता द्यावे लागतील अशी पंचासमक्ष लाचेची मागणी करून ते स्वीकारण्याचे कबुल केले. आरोपीस दि.०२.०९.२०२६ रोजी १३.४४ वाजता ताब्यात घेण्यात आले असून गुन्हा दाखल होताच अटक करीत आहोत.सापळा अधिकारी श्री. बी. एस. जाधवर, पोलीस उप अधीक्षक ला. प्र. वि. जालना सापळा पथक यांनी कारवाई केली.

## पाटोदा तालुक्यात पावसाचा मोठा खंड: सोयाबीनची पिके जळाली

**पाटोदा । प्रतिनिधी**

चालू पावसाळ्यात पाटोदा तालुक्यात पावसाने दडी मारल्यामुळे सोयाबीन पीक पूर्णपणे जळण्याच्या मार्गावर आहे. ऐन पावसाळ्यात उन्हाळ्यासारखे कडक ऊन पडत असल्याने तालुक्यातील तलाव, विहिरी आणि कूपनलिका (बोर) कोरड्या पडल्या आहेत. या अभूतपूर्व परिस्थितीमुळे शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेवर दुहेरी संकट कोसळले असून, पशुधनाला जगवायचे कसे, असा गंभीर प्रश्न बळीराजासमोर निर्माण झाला आहे.पिकांचे अतोनात नुकसान: सोयाबीन हातचे गेलेतालुक्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने सोयाबीनची पेरणी केली होती. सुरुवातीला काही प्रमाणात झालेल्या पावसानंतर पिके जोमात आली होती. मात्र, गेल्या काही आठवड्यांपासून पावसाचा थेंबही पडलेला नाही. पावसाळ्यात दुपारच्या वेळी उन्हाळ्यासारखे कडक ऊन पडत आहे. पाण्याचा ताण सहन न झाल्यामुळे सोयाबीनची पिके शेतातच करपून आणि जळून खाक होत आहेत. यामुळे शेतकऱ्यांचा लागवड खर्चही निघणे कठीण झाले आहे.जलस्रोत कोरडे: पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीरपावसाअभावी तालुक्यातील भूजल पातळी प्रचंड खालावली आहे. तालुक्यातील लहान-मोठे पाझर तलाव आणि जलसाठे कोरडे ठाण पडले आहेत. शेतकऱ्यांच्या विहिरींनी तळ गाठला असून,



शेकडो फूट खोल असलेले बोरवेलही आटले आहेत. यामुळे केवळ शेतीच्या पाण्याचाच नव्हे, तर ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे. नागरिक पाण्यासाठी वणवण भटकत आहेत.पशुधनाचा चारा प्रश्न: बळीराजा हवालदिलशेतीसोबतच ग्रामीण भागाची अर्थव्यवस्था पशुपालनावर अवलंबून आहे. मात्र, सध्या तालुक्यात निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे पशुधन धोक्यात आले आहे. पाऊस नसल्याने शिवारात गवत उगवलेले नाही आणि पेरलेला चाराही जळून गेला आहे. पाण्याचा आणि चाऱ्याचा तीव्र टंचाईमुळे ''आपली जनावरे कशी जगवायची?'' या विवंचनेत शेतकरी सापडला आहे. बाजारात चाऱ्याचे भाव गगनाला भिडले असून, आर्थिक टंचाईमुळे चारा खरेदी करणे शेतकऱ्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहे.प्रशासनाकडून तातडीच्या उपाययोजनांची मागणी पाटोदा तालुक्यातील या भीषण परिस्थितीवर मात करण्यासाठी शासनाने आणि प्रशासनाने तातडीने पावले उचलण्याची मागणी जोर धरत आहे.जळालेल्या सोयाबीन पिकांचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना पीक विमा आणि शासकीय मदत मिळावी.पशुधनाला वाचवण्यासाठी तालुक्यात तातडीने शासकीय चारा छावण्या किंवा चारा डेपो सुरू करण्यात यावेत.पाणीटंचाईग्रस्त गावांमध्ये आणि वाड्या-वस्त्यांवर तात्काळ पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू करण्यात यावेत.ऐन पावसाळ्यात ओढवलेल्या या भीषण सुक्या दुष्काळसदृश परिस्थितीमुळे पाटोदा तालुक्यातील जनता आणि शेतकरी हवालदिल झाला असून, आता केवळ आणि केवळ शासकीय मदतीकडेच सर्वांचे डोळे लागले आहेत.

## डॉ.महेंद्र पटवांना कडा डॉक्टर असोसिएशनच्या उपाध्यक्षपदावरून निलंबित

आष्टी । प्रतिनिधी



**कडा येथील डॉक्टर महेंद्र रसिकलाल पटवा यांच्याविरोधात आलेल्या गंभीर तक्रारीच्या पार्श्वभूमीवर कडा मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनने त्यांच्यावर मोठी कारवाई केली आहे. डॉ. महेंद्र पटवा यांना असोसिएशनच्या उपाध्यक्षपदावरून निलंबित करण्यात आल्याचे अधिकृत पत्राद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे.**

कडा मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. पंडित खिल्लारे आणि सचिव डॉ. संदिश देशमुख यांच्या स्वाक्षरीचे हे पत्र २ सप्टेंबर २०२६ रोजी जारी करण्यात आले आहे. या पत्रामुळे कडा परिसरात चर्चेला उधाण आले आहे. असोसिएशनने डॉ. महेंद्र रसिकलाल पटवा यांना पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे की, त्यांच्याबाबत आलेल्या गंभीर स्वरूपाच्या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर तसेच संबंधित प्रकरणामुळे कडा शहरातील नागरिकांमध्ये निर्माण झालेली तीव्र नाराजी व संतापाची भावना असोसिएशनच्या निदर्शनास आली आहे. या पार्श्वभूमीवर कडा डॉक्टर असोसिएशनमधील सर्व सदस्यांचा विचार घेऊन डॉ. पटवा यांना उपाध्यक्षपदावरून निलंबित करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे. कडा येथील १९ वर्षीय तरुणीने डॉक्टर महेंद्र पटवा यांच्यावर गैरवर्तनाचा आरोप करत पोलिसांत तक्रार दिल्यानंतर या प्रकरणाने गंभीर स्वरूप धारण केले. आष्टी पोलिस ठाण्यात या प्रकरणी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेनंतर कडा शहरात नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले होते. 'पटवा, हटवा' अशी मागणी करत नागरिकांनी शहर बंद ठेवून संबंधित पदांवरून डॉ. पटवा यांना हटविण्याची मागणी केली होती. यानंतर श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळानेही डॉ. पटवा यांना कार्यकारी मंडळाच्या मानद मंत्री पदावरून निलंबित करण्याचा निर्णय घेतला. आता कडा मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशननेही उपाध्यक्षपदावरून निलंबित केल्याने पटवा यांच्याविरोधातील कारवाईची मालिका पुढे सुरू असल्याचे चित्र आहे. पोलिस तपासाकडे लक्ष दरम्यान, या प्रकरणातील आरोपी डॉ. महेंद्र पटवा सध्या अहिल्यानगर येथील रुग्णालयात उपचार घेत.

# पाटोद्याच्या असीमचा थेट मोदींच्या स्वागत सोहळ्यात सन्मान!

**किर्गिझस्तानमध्ये एमबीबीएसचे शिक्षण घेणाऱ्या सय्यद असीम शफाऊद्दीनला पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या स्वागताचा मान; स्वतः रेखाटलेले मोदींचे चित्रही दिले भेट**

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा शहराच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. वैद्यकीय शिक्षणासाठी गेल्या चार वर्षांपासून किर्गिझस्तानमध्ये वास्तव्यास असलेल्या सय्यद असीम शफाऊद्दीन याला भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या किर्गिझस्तान दौऱ्यादरम्यान आयोजित स्वागत समारंभात सहभागी होण्याचा विशेष बहुमान मिळाला.

असीम हा किर्गिझस्तानमध्ये एमबीबीएसचे शिक्षण घेत असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या बिश्केक दौऱ्यावेळी आयोजित करण्यात आलेल्या स्वागत कार्यक्रमात त्याला उपस्थित राहण्याची संधी मिळाली. परदेशात वैद्यकीय शिक्षण घेत असताना देशाच्या पंतप्रधानांच्या स्वागत सोहळ्यात सहभागी होण्याची मिळालेली संधी ही असीमसह त्याच्या कुटुंबासाठी आणि पाटोदा शहरासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. विशेष म्हणजे, सय्यद असीमने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सुंदर चित्र स्वतः रेखाटले असून, हे चित्र त्याने पंतप्रधानांना भेट म्हणून दिले. वैद्यकीय शिक्षणासोबतच चित्रकलेची आवड जोपासत असीमने आपल्या कलेतून देशाच्या सर्वोच्च नेतृत्वाप्रती असलेल्या भावना व्यक्त केल्या. याबाबत असीमचे वडील सय्यद शफीयुद्दीन यांनी आनंद व्यक्त करताना सांगितले की, बिश्केक येथे आयोजित पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वागत समारंभात असीमला सहभागी होण्याची आणि त्यांचे स्वागत करण्याची संधी मिळाली, हा आमच्यासाठी अत्यंत अभिमानाचा आणि अविस्मरणीय क्षण आहे. दरम्यान, आमदार सुरेश आण्णा धस यांनी सय्यद असीम शफाऊद्दीन याचे अभिनंदन करून त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. परदेशात वैद्यकीय शिक्षण घेत असताना मिळालेला हा विशेष बहुमान केवळ असीमच्या कुटुंबासाठीच नव्हे, तर संपूर्ण पाटोदा शहरासाठी अभिमानाचा क्षण ठरला आहे. पाटोद्यातील असीमला मोदींच्या स्वागताचा मान; किर्गिझस्तानमध्ये शहराचा डंका! पाटोद्याचा मुलगा पोहोचला थेट मोदींच्या स्वागत सोहळ्यात! एमबीबीएसच्या शिक्षणासोबत पाटोद्याचा मान उंचावला; असीमला मोदींच्या स्वागताची संधी! किर्गिझस्तानमध्ये पाटोद्याचा झेंडा; सय्यद असीमकडून मोदींचे स्वागत! असीमची भरारी थेट पंतप्रधानांच्या स्वागत सोहळ्यापर्यंत; पाटोद्यात अभिमानाची लाट!



## पान १ वरून...

### सीसीआयकडे 'कपास किसान' ॲपवर

'सात-बारा अपडेट नाही, मग सीसीआयकडे नोंदणी कशी करायची?' असा प्रश्न कापूस उत्पादक शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे. सीसीआयकडे कापूस विक्रीसाठी नोंदणी करताना शेतकऱ्यांचा आधार क्रमांकाशी लिंक असलेला मोबाइल क्रमांक तसेच अद्ययावत ऑनलाइन पीकपेरा नोंद आवश्यक आहे. सात-बारा उताऱ्यावर कापूस पिकाची नोंद उपलब्ध नसल्यास ऑनलाइन नोंदणी करताना अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणेने पीकपेरा नोंदणीची प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. कापूस विक्रीतील मध्यस्थांची साखळी कमी करून खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता आणण्याच्या उद्देशाने सीसीआयने हे ॲप विकसित केले आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांना घरबसल्या कापूस विक्रीसाठी नोंदणी करता येणार आहे. पीकपेरा नोंदणी संथ असल्याने नोंदणीची मुदत जवळ येण्यापूर्वीच सात-बारा उतारे अपडेट करण्याची प्रक्रिया पूर्ण करावी, अशी मागणी कापूस उत्पादक शेतकऱ्यांकडून होत आहे.

-------------

### १७ सप्टेंबरपासून बीड - पुणे तर

मार्गाच्या प्रगतीचा आढावा तसेच बीड - पुणे आणि बीड - मुंबई रेल्वे सेवा सुरू करण्यासंदर्भात उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, दूरदृश्य प्रणालीद्वारे छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मध्य रेल्वेचे मुख्य अभियंता (निर्माण) बी. के. सिंह, अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक पद्मसिंह जाधव, वरिष्ठ विभागीय अभियंता व्ही. पी. पैठणकर, सीसीएम डॉ. सुमंत देऊळकर, विल्यम केरी यांच्यासह रेल्वे व प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, बीडसह संपूर्ण मराठवाड्याच्या विकासाला नवी गती देणाऱ्या बीड - पुणे आणि बीड - मुंबई रेल्वे सेवेसाठी दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या दूरदृष्टीमुळे अहिल्यानगर - बीड - परळी या महत्त्वाकांक्षी रेल्वे प्रकल्पाला गती मिळाली. गतवर्षी बीडकरांची ४० वर्षांची प्रतीक्षा संपवून मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी (१७ सप्टेंबर २०२५ रोजी) बीड ते अहिल्यानगर रेल्वे सेवा प्रत्यक्ष सुरू झाली आणि आता यावर्षी त्याच ऐतिहासिक दिनी बीड - पुणे रेल्वे सेवा सुरू होत आहे. बीड - पुणे रेल्वे सुरू झाल्यानंतर जिल्ह्याची पुणे आणि पश्चिम महाराष्ट्राशी थेट व अधिक सक्षम रेल्वे जोडणी निर्माण होणार आहे. यामुळे बीडच्या कृषी, औद्योगिक, शैक्षणिक, सामाजिक आणि व्यापार क्षेत्राच्या विकासाला मोठी चालना मिळणार असून, नागरिकांच्या प्रवासाचा वेळ आणि खर्च कमी होण्यासही मदत होणार आहे. बीडच्या आर्थिक विकासासाठी हा रेल्वे मार्ग अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी सूचना देताना सांगितले की, १७ सप्टेंबर रोजी बीड - पुणे रेल्वे सेवा सुरू करण्यासाठी उर्वरित सर्व तांत्रिक, प्रशासकीय व सुरक्षाविषयक प्रक्रिया वेळेत पूर्ण कराव्यात. त्याचबरोबर डिसेंबरअखेर बीड - मुंबई रेल्वे सेवा सुरू करण्याचे उद्दिष्ट ठेवून आवश्यक कामांचा कालबद्ध आराखडा तयार करून सर्व कामे युद्धपातळीवर पूर्ण करावीत. येत्या मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या बीडपुणे रेल्वे सेवेच्या ऐतिहासिक शुभारंभ कार्यक्रमाची सर्व तयारी अत्यंत नियोजनबद्ध, प्रभावी आणि समन्वयाने करण्याच्या सूचनाही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिल्या. बीड - पुणे आणि पुढे बीड -मुंबई ही केवळ रेल्वे सेवा नसून बीडच्या विकासाला जोडणारी नवी जीवनवाहिनी आहे. दिवंगत अजितदादांनी पाहिलेल्या विकसित बीडच्या स्वप्नपूर्तीसाठी या रेल्वे जोडणीची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार असल्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी नमूद केले.

------------

### ठाकरे गटाला ती चूक

उपस्थित आहेत. ठाकरे गटाने पक्षघटनेत हस्तक्षेप करून आपल्या अधिकारांच्या मर्यादा ओलांडल्याचा दावा केला आहे. मात्र, नीरज किशन कौल यांनी हा आरोप फेटाळून लावला. राजकीय पक्षांमध्ये अंतर्गत लोकशाही असणे आवश्यक आहे, याबाबत निवडणूक आयोगाने १९९४ पासूनच राजकीय पक्षांना निर्देश दिले असल्याचे त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. त्यामुळे पक्षाच्या अंतर्गत रचनेचा विचार करणे हा आयोगाच्या अधिकारक्षेत्राबाहेरील विषय नाही, असा युक्तिवाद शिंदे गटाने केला. पक्षातील सर्व महत्त्वाच्या नियुक्त्या काही मोजक्या व्यक्तींच्या हातात असतील, तर पक्षातील वास्तविक बहुमत ठरवायचे तरी कसे, असा प्रश्न कौल यांनी उपस्थित केला. राजकीय पक्षाची संघटनात्मक रचना लोकशाही पद्धतीची असणे गरजेचे आहे. अन्यथा पक्षातील कोणत्या गटाला खरे बहुमत आहे, याचा निष्पक्ष निर्णय घेणे कठीण होईल, असा मुद्दा त्यांनी मांडला. शिवसेनेच्या पक्षघटनेतील बदलाचा मुद्दाही शिंदे गटाने सर्वोच्च न्यायालयात उपस्थित केला. कौल यांच्या म्हणण्यानुसार, सुरुवातीच्या काळात शिवसेनेच्या घटनेत पक्षांतर्गत निवडणुकांची तरतूद नव्हती. निवडणूक आयोगाच्या निर्देशांनंतर १९९९ मध्ये पक्षघटनेत बदल करून अधिक लोकशाहीवादी रचना स्वीकारण्यात आली. मात्र, २०१८ मध्ये पक्षाची नवी घटना समोर आली आणि त्यातून १९९९ मध्ये करण्यात आलेली लोकशाहीवादी रचना मोठ्या प्रमाणात बदलण्यात आल्याचा दावा शिंदे गटाने केला. या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणून शिंदे गटाने २०१८ च्या पक्षघटनेच्या नोंदणीचा प्रश्न उपस्थित केला आहे. ठाकरे गट आपल्या दाव्यासाठी २०१८ मधील पक्षघटनेचा आधार घेत असला, तरी ही सुधारित घटना निवडणूक आयोगाकडे अधिकृतरीत्या नोंदवण्यात आली नव्हती, असा दावा कौल यांनी केला. आयोगाच्या नोंदींमध्ये २०१८ च्या या घटनेचा समावेश नसल्याचेही त्यांनी सांगितले. ठाकरे गटाकडून शिंदे यांनी याच पक्षघटनेनुसार पूर्वी पक्षातील विविध पदे स्वीकारली होती, मग आता त्याच घटनेवर प्रश्न उपस्थित करण्याचा अधिकार त्यांना कसा, असा सवाल करण्यात आला होता. यावर कौल यांनी हा वाद व्यक्तीने पूर्वी कोणते पद स्वीकारले होते किंवा नाही, याभोवती फिरत नसल्याचे स्पष्ट केले. निवडणूक आयोगाने पक्षातील बहुमत कशाच्या आधारावर ठरवावे आणि संबंधित राजकीय पक्षावर वास्तविक नियंत्रण कोणाचे आहे, हा या प्रकरणाचा केंद्रबिंदू असल्याचे त्यांनी सांगितले. शिवसेनेच्या मूळ विचारधारेपासून पूर्णपणे वेगळ्या राजकीय भूमिकेच्या पक्षांसोबत आघाडी करण्यात आल्याने शिवसैनिक आणि पक्षातील मोठ्या वर्गात असंतोष निर्माण झाला होता, असा युक्तिवाद कौल यांनी केला. हा असंतोष सातत्याने व्यक्त होत होता आणि अखेर त्यातून बंडाची परिस्थिती निर्माण झाली. त्यानंतरच शिंदे गटाने आपणच 'मूळ शिवसेना' असल्याचा दावा केल्याचे त्यांनी न्यायालयाला सांगितले.

------------

### अर्थसंकल्पातील मंजूर निधी

वसतिगृहांना जागा उपलब्ध करून देणे, प्रलंबित शिष्यवृत्तीची रक्कम अदा करणे आणि ३६ ओबीसी जातींचा केंद्राच्या यादीत समावेश करणे अशा सुमारे १३ ते १४ महत्त्वाच्या मुद्द्यांवर ओबीसी मंत्रीमंडळ उपसमितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच, ओबीसी महामंडळांच्या निधीचा प्रश्न येत्या डिसेंबरपर्यंत मार्गी लावण्याचा आणि काही विषय राज्य नियोजन समितीकडे पाठविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय झाला. ओबीसीमधील सर्व समाजाला न्याय देण्याची भूमिका सरकारची आहे, असे सांगून ते म्हणाले, राज्यातील ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या योजना आणि महामंडळांच्या सक्षमीकरणासाठी शासन कटिबद्ध असून, कोणत्याही महामंडळाला किंवा योजनांना निधीची कमतरता भासू देणार नाही. 'महाज्योती'सह सर्व महामंडळांना प्रत्येकी ३०० कोटी रुपये देण्यात आले आहेत. मात्र, महाज्योतीने १ हजार कोटी रुपयांची मागणी केली आहे. निधीअभावी कोर्सेस बंद पडल्याची बाब समोर आल्यावर, ३०० कोटींचा निधी का कमी पडत आहे, याची कारणमीमांसा उपसमितीसमोर ठेवण्याचे आणि त्यानंतर तो प्रस्ताव मंत्रीमंडळासमोर आणण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. १२५ कोटी रुपयांची प्रलंबित बिले तातडीने अर्थ विभागाकडे पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. 'महाज्योती'च्या पीएचडी फेलोशिपचे १२६ कोटी रुपयांचे प्रलंबित दायित्व असून, डिसेंबरपर्यंत हा सर्व निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. वनार्टी संस्थेकडे सध्या ५० कोटींचा निधी असून ३०० कोटींची मागणी करण्यात आली आहे. हा प्रस्ताव राज्य नियोजन समितीकडे पाठविण्याचे निर्देश देण्यात आले. आहेत.

------------

### सरकारचा प्रस्ताव जरांगे यांच्या समोर; मागण्या

बहुतांश मागण्यांना प्रतिसाद दिल्याचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले आहे. मात्र, सर्व मागण्या पूर्ण झाल्याचे आणि त्यानंतर जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घेतल्याचे आजपर्यंत अधिकृत वृत्त उपलब्ध नाही. उलट ताज्या वृत्तानुसार जरांगे पाटील उपोषण सुरू ठेवून आपल्या मागण्यांवर ठाम आहेत. दरम्यान, जरांगे पाटील यांनी मागण्या पूर्ण न झाल्यास आंदोलन पुढे नेण्याचा इशारा दिला असून १२ सप्टेंबरला मुंबईकडे जाण्याची भूमिका त्यांनी जाहीर केली आहे. त्यामुळे सरकार आणि जरांगे यांच्यातील पुढील चर्चा अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. सरकारकडून सकारात्मक पावले उचलली जात असली तरी अंतिम निर्णय आणि त्याची अधिकृत अंमलबजावणी झाल्यानंतरच मनोज जरांगे पाटील उपोषण मागे घेणार का, याचे चित्र स्पष्ट होणार आहे. दुपारी सेंभाजीनगरमध्ये उपसमितीचे अध्यक्ष मंत्री राधाकृष्ण विखेपाटील, मंत्री उद्द्यसामत व इतर सदस्य आणि अधिकाऱ्यांची बैठक झाली यावर चर्चा होवून मराठा आरक्षणा संदर्भात एक ससुदा तयार करण्यात आल.

--------------

### मराठवाडा दुष्काळाच्या छायेत; कृत्रिम

नाही. त्यामुळे खरीप पिके संकटात सापडली आहेत. त्यातच सप्टेंबर महिन्यातही पावसाचे प्रमाण कमी राहण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर धीरज देशमुख यांनी सोशल मीडिया अकाउंटवरून एक व्हिडिओ प्रसारित केला आहे. तर त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्याकडे महाराष्ट्रातील अत्यल्प पाऊस झालेल्या भागांत कृत्रिम पावसाचा प्रयोग राबवण्याची विनंती केली आहे. मराठवाड्यात पावसाने पाठ फिरवल्याने शेतकरी हवालदिल झाला असून, पिके वाया जाण्याच्या मार्गावर आहेत. अशा परिस्थितीत केवळ पावसाची प्रतीक्षा करण्याऐवजी सरकारने उपलब्ध वैज्ञानिक आणि तांत्रिक पर्यायांचा तातडीने वापर करण्याची गरज आहे, असे देशमुख यांनी म्हटले आहे. कृत्रिम पावसाच्या प्रयोगामुळे हमखास पाऊस पडेल, असा दावा करता येणार नाही. मात्र, शेतकऱ्यांसमोरील अडचणीच्या काळात यामुळे काही प्रमाणात दिलासा मिळू शकतो. पावसाळ्याच्या उर्वरित कालावधीत योग्य हवामान आणि ढगांची अनुकूल परिस्थिती उपलब्ध असलेल्या भागांत हा प्रयोग राबविण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली. शेतकरी संकटात असल्याने उपलब्ध असलेला प्रत्येक वैज्ञानिक पर्याय वापरण्याची हीच वेळ आहे. शेतकऱ्यांच्या बाजूने सरकार ठामपणे उभे आहे, हे कृतीतून दाखवण्याची गरज आहे, असेही धीरज देशमुख यांनी सांगितले.

----------

### दिशा सालियन मृत्यू प्रकरणाचा तपास

सलियन यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. जून २०२० मध्ये मालाड येथील १४ व्या मजल्यावरून पडून दिशाचा मृत्यू झाला होता. दिशा सालियन यांचे वडील सतीश सालियन यांचे वकील निलेश ओझा यांनी न्यायालयाच्या निर्णयानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना याविषयी सविस्तर माहिती दिली. सीबीआयने दिशाचे वडील सतीश सालियन यांचा सविस्तर जबाब नोंदवावा, यानुसार एफआयआर दाखल करावे आणि या तपासासाठी एका वरिष्ठ अधिकाऱ्याची नियुक्ती करावा, असे निर्देश न्यायमूर्ती सारंग कोतवाल आणि न्यायमूर्ती रणजितसिंह भोसले यांच्या खंडपीठाने हे आदेश दिले असल्याचे ॲड. ओझा यांनी सांगितले. या प्रकरणी ज्यांच्याविरुद्ध ठोस पुरावे मिळतील त्यांच्यावरच कायदेशीर कारवाई केली जाईल. ज्यांच्याविरुद्ध पुरावे नाहीत, त्यांना निष्कारण आरोपी म्हणून गोवले जाणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.तपासाअंती जर सीबीआयने नकारात्मक अहवाल सादर केला, तर त्यावर आक्षेप घेण्याचा आणि प्रोटेस्ट पिटिशन दाखल करण्याचा अधिकार आम्हाला राहील, असा स्पष्ट उल्लेख न्यायालयाने आपल्या आदेशात केला आहे. याचिकाकर्त्यांचे वकील नीलेश ओझा यांनी दावा केला की, दिशावर सामूहिक बलात्कार करून तिची हत्या करण्यात आली होती. घटनेनंतर पाच वर्षांनी आणि न्यायालयात धाव घेतल्यानंतरच पोलिसांकडून शवविच्छेदन अहवाल मिळाला. तसेच, याचिकाकर्त्यांनी शिवसेना (उबाठा) नेते आदित्य ठाकरे आणि इतरांवर संशय व्यक्त करूनही पोलिसांनी एफआयआर का नोंदवला नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

----------

### मुंबई-कोलकाता

वाढल्याने शहरी पायाभूत सुविधा, वाहतूक व्यवस्था, ऊर्जा ग्रीड, इमारती आणि भूजल संसाधनांचे मोठे नुकसान आधीच सुरू झाले आहे. याचे दूरगामी परिणाम दीर्घकालीन विकास आणि आर्थिक स्थिरतेवर होत आहेत. दक्षिण आशियातील सखल डेल्टा भाग आणि मुंबई-कोलकाता यांसारख्या शहरांमध्ये १.४ कोटींपेक्षा जास्त लोकांचे क्षेत्र कायमस्वरूपी पाण्याखाली जाण्याचा थेट धोका आहे. दुसरीकडे मियामी, न्यू यॉर्क आणि ग्वांगझू या उच्च उत्पन्न असलेल्या शहरांमध्ये तटीय पायाभूत सुविधांना तब्बल २ ते ३.५ लाख कोटी अमेरिकन डॉलर्सचे आर्थिक नुकसान सहन करावे लागू शकते. अहवालानुसार, समुद्राच्या पातळीत वाढ आणि भूस्खलनाच्या एकत्रित परिणामांमुळे पुराचा धोका वाढला असून जनजीवन, उपजीविका आणि जल परिसंस्थेचे नुकसान होत आहे. तटीय भागातील आरोग्य सेवा आणि स्वच्छतेच्या सुविधा कोलमडल्यामुळे साथीचे आजार, मृत्यूचा धोका आणि मानसिक ताणतणाव वाढत आहे.

**तातडीच्या उपायांची गरज**

तटीय भागात महापूर, पिण्याचे पाणी खारे होणे, जमिनीची धूप आणि परिसंस्थेचा ऱ्हास यांमुळे अर्थव्यवस्था, संस्कृती आणि पर्यावरणावर गंभीर परिणाम होत आहेत. कृषी, पर्यटन आणि व्यापाराचे होणारे नुकसान टाळण्यासाठी दीर्घकालीन योजना, आपत्कालीन निधी, अचूक वैज्ञानिक डेटा आणि मजबूत तांत्रिक व कायदेशीर चौकटीची तातडीने गरज असल्याचे अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

--------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि.०३ सप्टेंबर २०२६


## थोडक्यात



### संत भगवानबाबा हे सत्वपरीक्षेणे सिद्ध झालेले परमात्मा – ॲड सर्जेराव तांदळे

बीड । प्रतिनिधी

मंगळवार दिनांक १ सप्टेंबर २०२६ रोजी देशातील विविध भागांमध्ये संत भगवानबाबांचा १३० वा जन्मोत्सव अतिशय भक्तिमय आणि उत्साहाच्या वातावरणामध्ये अनेक ठिकाणी संपन्न झाला,बीड शहरामध्ये अहिल्यानगर रोड भागातील संत भगवान बाबा चौकामध्ये अनेक जाती धर्मातील मान्यवरांनी एकत्र येऊन मनोभावे भगवान बाबांच्या प्रतिमेचे पूजन करून महाआरती केली, रक्तदान ,अन्नदान ,मोटरसायकल रॅली काढून बाबांच्या नावाचा जयघोष केला. राष्ट्रसंत भगवानबाबांना जीवनामध्ये अनेक अडचणीला सामोरे जावे लागले अनेक वेळा सत्व परीक्षां द्याव्या लागल्या परंतु सर्व परीक्षेत बाबांनी स्वतःला सिद्ध केले, भगवान बाबांचे जीवन चरित्र म्हणजे एकसंघर्ष गाथा आहे .भगवान बाबांनी आठरा पगड जाती-जमातीतील वंचित पीडित लोकांना सन्मार्ग दाखवण्याचे महान कार्य केले संप्रदायाबरोबरच शिक्षणाचे महत्त्व भावी पिढीला पटवून दिले ‘‘ एकर विका अन्? लेकरं शिकवा ‘‘ या मूलमंत्र्यावरच विविध समाजामध्ये बुद्धिवंतांचा डोलारा उभा राहिला आहे आसे ॲड सर्जेराव तांदळे म्हणाले या वेळी माजी मंत्री प्रा सुरेश आण्णा नवले, प्रा सुशीलाताई मोराळे,माजी आ जनार्धन तुपे, ॲड विजय राख ,मुरलीधर बप्पा ढाकणे ,चंद्रकांत भाऊ सानप,आशोक हिंगे ,डॉ योगेश क्षिरसागर, डॉ सारिका सिरसागर, विनोद मुळूक ,अमर नाईकवाडे ,ॲड अजय तांदळे, दादासाहेब मुंडे , फारुख पटेल, सय्यद मुस्तफा ,सनी माने भैया मोरे, ॲड जयंत राख , ॲड नागेश तांबारे गणेश जगताप ,अभिजीत तांदळे ,सुनील सुरवशे सनी वाघमारे, श्याम धांडे,मंगेश धोंगडे,राजू गुजर ,रणजीत बनसोडे गणेश लांडे ,शांतिनाथ डोरले, संग्राम बांगरआदी मान्यवरांनी राष्ट्रसंत भगवान बाबाच्या प्रतिमेचे मनोभावे पूजन करून दर्शन घेतले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समर्थ तांदळे, विराज राख, वीरेंद्र सानप, अविनाश सानप,विशाल खाडे, अमर सानप,उमेश फड यांनी परिश्रम घेतले.

### आष्टीत चारा डेपो सुरू करण्याची आ. सुरेश धस यांची मागणी

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी विधानसभा मतदारसंघातील आष्टी, पाटोदा व शिरूर (का.) या तालुक्यांमध्ये पावसाअभावी तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली असून, त्याचा परिणाम पशुधनावरही होत आहे. जनावरांसाठी चाऱ्याची गंभीर टंचाई निर्माण झाल्याने तातडीने शासकीय चारा डेपो सुरू करण्यात यावेत, अशी मागणी आ. सुरेश धस यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

आष्टी विधानसभा मतदारसंघातील अनेक भागांत अपेक्षित प्रमाणात पाऊस न झाल्याने शेतकरी व पशुपालक संकटात सापडले आहेत. अनेक गावांमध्ये पाणीटंचाईची परिस्थिती गंभीर बनली असून, जनावरांसाठी पिण्याच्या पाण्यासह चाऱ्याचा प्रश्नही दिवसेंदिवस तीव्र होत आहे. मतदारसंघात दूध उत्पादन व पशुपालन हा अनेक कुटुंबांच्या उपजीविकेचा प्रमुख व्यवसाय आहे. मात्र, पावसाअभावी चाऱ्याचे उत्पादन घटले असून बाजारातील चाऱ्याचे दर वाढल्याने पशुपालकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे. त्यामुळे पशुधन सांभाळणे शेतकरी व पशुपालकांसाठी मोठे आव्हान बनले आहे. या पार्श्वभूमीवर आष्टी, पाटोदा व शिरूर (का.) तालुक्यातील चारा टंचाईग्रस्त गावांचे तातडीने सर्वेक्षण करून तेथील पशुधनाची मोजणी करण्यात यावी. तसेच आवश्यकतेनुसार संबंधित गावांमध्ये शासकीय चारा डेपो तातडीने सुरू करून जनावरांसाठी चाऱ्याची उपलब्धता करावी, अशी मागणी आ. सुरेश धस यांनी केली आहे.

# गरीब हमालांच्या जमिनी हक्कासाठी मनुर शिवारात आमरण उपोषण सुरू

## गट नं.२५ मधिल चुकीच्या फेरफाराची चौकशी करून न्याय देण्याची आंबेडकरी विचार मोर्चाची मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मनुर शिवारातील गट नं.२५ मधील सुमारे ७.५ ते ८ एकर जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर झालेल्या फेरफारांची चौकशी करून हमालांना न्याय मिळावा,या मागणीसाठी आंबेडकरी विचार मोर्चाचे मराठवाडा अध्यक्ष सय्यद सलीमबापू यांनी मंगळवार दि.१ रोजी मनुर शिवारातील गट नं.२५ येथे आमरण उपोषण सुरू केले आहे.दरम्यान तहसीलदार,मंडळ अधिकारी,तलाठी यांच्या अर्थपूर्ण सहकार्यामुळे गट नं.२५ मध्ये बेकायदेशीर फेरफार झाल्याचा आरोप सलीमबापु यांनी यावेळी केला आहे.

मनुर शिवारातील गट नं. २५ मधील सुमारे ७.५ ते ८ एकर जमिनीच्या मालकी हक्काचा वाद आता ऐरणीवर आला आहे.तत्कालीन




तहसीलदार,मंडळ अधिकारी, तलाठी यांच्या अर्थपूर्ण सहकार्यामुळे गट नं.२५ मध्ये बेकायदेशीर फेरफार.सलीमबापु

अध्यक्ष मयत भुजाबा खांडेकर यांच्या नावावर खरेदीखत करण्यात आलेल्या जमिनीवर एनए लेआऊट करून सुमारे २०० ते २२५ प्लॉट हमालांना खरेदीखत करून देण्यात आहेत.मात्र,अनेक हमाल अशिक्षित असल्याने त्यांनी ग्रामपंचायत रेकॉर्डमध्ये नावे लावून पीटीआर घेतली;परंतु ७/१२ उताऱ्याच्या मालकी रकान्यात त्यांची नावे आली नाहीत.त्यानंतर भुजाबा खांडेकर यांच्या निधनानंतर त्यांच्या वारसांनी चुकीच्या पद्धतीने ७/१२ वर नावे लावून घेतली.या प्रकरणात गरीब हमालांना न्याय देण्याची वारंवार मागणी सलीम बापु यांनी प्रशासनाकडे करून दखल घेतली नाही.सदरील प्रकरणात संबंधित तलाठी,मंडळ अधिकारी आणि तहसीलदार यांच्या अर्थपूर्ण सहकार्याने फेरफार करण्यात आल्याचा आरोप करत

सय्यद सलीमबापू यांनी निवेदनाद्वारे दिलेल्या इशाऱ्या प्रमाणे मनुर शिवारात उपोषण मंगळवार दि.१ सप्टेंबर रोजी सकाळी उपोषण सुरू केले आहे.संबंधित फेरफार कोणत्या कागदपत्रांच्या आधारे करण्यात आले ?हमालांकडे खरेदीखत असताना त्यांच्या नावांची मालकी हक्काच्या रकान्यात नोंद का झाली नाही? वारसांची नावे ७/१२ वर कोणत्या आधारावर दाखल करण्यात आली?गट नं.२५ ची तातडीने शासकीय मोजणी करून हद्द निश्चित करावी,पात्र हमालांच्या नावांची ७/१२ वर नोंद घ्यावी, कथित बेकायदेशीर फेरफार रद्द करावेत आणि प्रकरण निकाली निघेपर्यंत या जमिनीचे कोणतेही खरेदीखत होऊ नये,यासाठी दुय्यम निबंधकांना आदेश द्यावेत,अशा प्रमुख मागण्या सलीमबापु यांनी यावेळी लाऊन धरल्या आहेत. दरम्यान,मागण्यांची पूर्तता होईपर्यंत आमरण उपोषण सुरूच ठेवण्याचा निर्धार सय्यद सलीमबापू यांनी व्यक्त केला आहे.त्यामुळे गट नं.२५ च्या जमिनीचा हा वाद आता प्रशासनासाठीही चांगलाच कसोटीचा ठरण्याची शक्यता आहे.

# बनसारोळा येथील आदर्श विद्यालयाच्या मुख्याध्यापकाकडून संस्थेची फसवणूक

### बीडमध्ये ग्रामविकास शिक्षण प्रसारक मंडळाचे सदस्य राजपाल काकडे यांचे बेमुदत उपोषण

बीड । प्रतिनिधी

केज तालुक्यातील बनसारोळा येथील आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापकांनी संस्था आणि जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाची दिशाभूल करून बोगस मान्यता मिळवल्याचा आरोप समोर आला आहे. याप्रकरणी मुख्याध्यापक बाळासाहेब काकडे यांची चौकशी करून त्यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करावा, या मागणीसाठी ग्रामविकास शिक्षण प्रसारक मंडळाचे सदस्य राजपाल अशोकराव काकडे यांनी दि.१ सप्टेंबरपासून बीड येथील जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले आहे.

राजपाल काकडे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, विद्यालयात कार्यरत सहशिक्षक बाळासाहेब कल्याणराव काकडे यांना संस्थेने मुख्याध्यापकपदासाठी कोणताही अधिकृत ठराव किंवा संमतीपत्र दिलेले




नसतानाही, बनावट सह्या व खोटे ठराव सादर करून मुख्याध्यापकपदाची मान्यता मिळविल्याचा आरोप आहे. हा प्रकार संस्थेच्या हिताला घातक असल्याचे राजपाल काकडे यांनी म्हटले आहे. या प्रकरणासंदर्भात मागील चार महिन्यांपासून शिक्षण विभागाकडे वारंवार लेखी निवेदने, पुरावे व तक्रारी सादर करूनही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही, असा आरोपही त्यांनी केला आहे. त्यामुळे न्याय मिळवण्यासाठी अखेर उपोषणाचा मार्ग स्वीकारला असून, संबंधित मुख्याध्यापकांची चौकशी करून बोगस मान्यता रद्द करावी आणि दोषींवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

**चार महिन्यांत १६ वेळा दिली पत्रे**

राजपाल काकडे यांनी जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाकडे प्रत्यक्ष तसेच पोस्टाद्वारे मागील चार महिन्यांत तब्बल १६ पत्रे दिल्याचे सांगितले. यापैकी एका पत्राला शिक्षणाधिकारी प्रिया पाटील यांनी प्रतिसाद दिला; मात्र अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप काकडे यांनी केला आहे. त्यामुळे त्यांनी बेमुदत उपोषण सुरू केले आहे. उपोषणाच्या पहिल्या दिवशी सायंकाळपर्यंत शिक्षण विभागाचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी भेटण्यासाठी आला नसल्याचे त्यांनी सांगितले.

## पान ६ वरून...

### धारूर पोलीस स्टेशनचे राठोड

उलटूनही संबंधित सीसीटीव्ही फुटेज तपासून आपल्याला न्याय देण्यात आलेला नाही असा आरोप त्यांनी केला आहे.या प्रकरणी त्यांनी ११ मे २०२६ रोजी एसपी नवनीत कॉवत तसेच १५ मे २०२६ रोजी डीवायएसपी वेंकटराम यांची प्रत्यक्ष भेट घेऊन लेखी निवेदन दिल्याचे नमूद केले आहे.

**एसपी साहेब न्याय देतील अन्यथा आमरण उपोषण.**

बाळकृष्ण अंडील म्हणाले फिर्यादी आणि पोलिसांकडून नेमके काय झाले हे धारूर पोलीस ठाण्यातील सीसीटीव्ही फुटेज तपासल्यास स्पष्ट होईल. त्यामुळे संबंधित तारखांचे सीसीटीव्ही फुटेज तपासून गु.र.नं. ४२/२०२६ बाबत योग्य निर्णय घेऊन आम्हाला न्याय द्यावा. बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत व डीवायएसपी वेंकटराम यांच्यावर आम्हाला विश्वास आहे. न्याय मिळाला नाही तर बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मी **माझ्या लहान मुलांसह आमरण उपोषणाला बसेन**

दरम्यान या प्रकरणातील आरोपांची सत्यता अधिकृत चौकशीअंतीच स्पष्ट होणार असून संबंधित पोलीस अधिकारी व फिर्यादी यांची बाजू समोर आल्यानंतरच संपूर्ण वस्तुस्थिती स्पष्ट होऊ शकणार आहे. त्यामुळे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडून या तक्रारीची निष्पक्ष चौकशी करून सीसीटीव्ही फुटेजची पडताळणी केली जाते का याकडे पहाडी पारगावसह परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### जुगार आणि दारूविक्रीविरुद्ध

महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा नोंदवून संबंधिताकडून १३ हजार ९० रुपयांची अवैध दारू व मोबाईल जप्त करण्यात आला.

सदर धडक कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख, बीडचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. व्यंकटरमण, तसेच आष्टीचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. विश्वजित खुळे यांच्या मार्गदर्शनाखाली परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक श्री. भारत पांढरे आणि त्यांच्या पथकातील अधिकारी व अंमलदारांनी पार पाडली. या सर्व प्रकरणांचा पुढील तपास संबंधित पोलीस करत आहेत.

### मनोज जरांगे यांचे उपोषण

मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक मागासलेपणासंदर्भात विविध वस्तुनिष्ठ बाबी शासनासमोर मांडण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक संधी उपलब्ध करून देणे तसेच पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या विविध योजनांचा प्रभावी लाभ मिळवून देणे आवश्यक आहे.आरक्षणाच्या मागणीबाबत शासनाने उपलब्ध कायदेशीर तरतुदी तसेच उपलब्ध वस्तुनिष्ठ माहितीचा विचार करून योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक आहे. सदर मागणीच्या अनुषंगाने सर्व संबंधित घटकांच्या हिताचा निर्णय घेण्यासाठी शासनाने आवश्यक ती प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी.या अनुषंगाने अंतरवली सराटी येथे भेट देऊन सुरू असलेल्या आंदोलनाची सद्यस्थिती जाणून घेतली व मराठा समाजाच्या मागण्यांबाबत शासनाने सकारात्मक आणि प्रशासकीय पातळीवर योग्य तो निर्णय घ्यावा, अशी भूमिका आ.प्रकाश सोळंके यांनी व्यक्त केली. मनोज दादा जरांगे पाटील यांना वारंवार उपोषण करण्याची वेळ येऊ नये,उपोषणामुळे त्यांच्या आरोग्यास धोका निर्माण होऊ शकतो यासाठी शासनाने घेतलेल्या निर्णयांची,पाटलांनी केलेल्या मागण्यांची पूर्तता प्रभावी व कालबद्ध अंमलबजावणी सुनिश्चित करून सदर प्रश्नावर कायमस्वरूपी प्रशासकीय व कायदेशीर तोडगा काढावा, अशी अपेक्षा आ.प्रकाश सोळंके यांनी व्यक्त केली आहे.

### शीवरस्ता ते तिकांडे-शिंदे वस्तीचा

कार्यवाही अपेक्षा आहे. हा शेतरस्ता या पूर्वीच शेतकऱ्यांनी ग्रामप्रशासन व महसुल प्रशासनाच्या समक्ष रस्ता खुल्या मनाने मोकळा करून दिला होता. या कौतुकास्पद कामगीरीवर श्री. विश्वाभर शिंदे व माऊली शिंदे याच्या सहकार्यातून अजिविका भारत रोजगार मिशन अतर्गत खडिकरणाचे काम करून शेतकऱ्यांना मजबुत व सुसाह्य शेतरस्ता देण्यासाठी सहकार्य करण्यात येईल असे मान्यवरांनी शेतकऱ्यांना सागीतले.ङ्गयावेळी धर्मराज शिंदे, आश्रुबा शेळके, बबन मिसाळ, आरूण तिकाडे, प्रदिप बोराडे सह प्रस्तावित गटातील सर्व शेतकरी यांनी महसुली पंचनामा वाचून त्यावर सहमतीने स्वाक्षरी केल्या यामध्ये श्री. प्रकाश सालपे, रमेश बबन मिसाळ, संतोष मिसाळ, श्री. भागवत गायकवाड, श्री. श्रीनिवास राऊत,श्री. त्र्यबक शिंदे, साईनाथ शिंदे, सह सर्व शेतकरी होते.ङ्गमौ. हिवरसिगामधील शेतकरी, महसुल व ग्रामप्रशासनाच्या सहकार्यातुन अनेक वर्षापासुन प्रलंबित समस्या सोडवण्या यश मिळाल्याने शिवराम राऊत सह सहभागी शेतकऱ्यांनी आभार मानले.


### नाळवंडी येथे नऊ वर्षांच्या

असलेल्या हातपंपावर पाणी आणण्यासाठी गेली असता नराधम बबन काळे हा बाजरीत दबा धरून बसुन मुलीला चॉकलेटचे आमिष दाखवून वाईट कृत केले बालिकेच्या ओरडण्याने चुलता व चुलतीने धाव घेऊन सुटका करून नराधमास पकडुन जोराचा चोप दिला.नंतर गावात व डोंगरकिन्हीत ही वार्ता पसरताच नागरीकांत संतापाचा उद्रेक झाला.आरोपीस अंमळनेर पोलिसांत नेले.घटनेचे गांभीर्य पहाता जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत कॉवोत यांच्या आदेशानुसार आष्टी उपविभागीय पोलिस अधिकारी हे तात्काळ घटनास्थळी तळ ठोकुन आहेत.अंमळनेर पोलिस ठाण्याचे निरीक्षक सतिष कोटकर यांनी तात्काळ गुन्हा नोंद करुन तपासास सुरुवात केली.आरोपीस कठोरात कठोर शिक्षा देण्याचं आश्वासन पोलिसांनी दिले आहे.नाळवंडी येथे जाहिर निषेध सभा घेऊन सर्व पक्षिय पदाधिकारी व महिलांनी आपल्या संतापाच्या भावना व्यक्त केल्या.

# पाटोदा तालुक्यात पावसाअभावी सोयाबीन करपले; संतप्त शेतकऱ्यांनी पिकात सोडली गुरे

पाटोदा । प्रतिनिधी

ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्याची सुरुवात झाली तरी पाटोदा तालुक्यात अपेक्षेप्रमाणे पाऊस न झाल्याने सोयाबीनचे पीक पूर्णपणे जळून खाक झाले आहे. हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने संतप्त आणि हताश झालेल्या शेतकऱ्यांनी अखेर आपल्या उभ्या सोयाबीनच्या पिकात गुरे चरण्यासाठी सोडून दिली आहेत.पाटोदा परिसरातील या परिस्थितीमुळे बळीराजा मोठ्या आर्थिक संकटात सापडला असून, परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. तालुक्यात झालेल्या या पीक नुकसानीची प्रमुख कारणे आणि सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे:पावसाचा मोठा खंड: गेल्या काही आठवड्यांपासून पावसाने पूर्णपणे दडी मारल्यामुळे जमिनीतील



ओलावा संपला आहे.उभी पिके करपली: कडक ऊन आणि पाण्याच्या कमतरतेमुळे सोयाबीनची पिके परिपक्व होण्याआधीच सुकू लागली आहेत.उत्पादनाचा खर्चही निघणे कठीण: बियाणे, खते आणि कोळपणीसाठी हजारो रुपये खर्च करूनही हातात काहीच पडणार नसल्याने शेतकरी उद्विग्न झाले आहेत.चारा टंचाईवर पर्याय: पीक वाया गेल्याने निदान जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न तरी मिटेल, या विवंचनेतून शेतकऱ्यांनी हा कठीण निर्णय घेतला आहे.या गंभीर परिस्थितीमुळे पाटोदा तालुक्यातील शेतकऱ्यांकडून प्रशासनाने तातडीने नुकसान भरपाईचे पंचनामे करावेत आणि कोरडा दुष्काळ जाहीर करून आर्थिक मदत द्यावी, अशी तीव्र मागणी केली जात आहे.

# हल्द्वानी ‘शुद्धीकरण’ जातीयवादी कृत्याचा काँग्रेस अनुसूचित जाती विभागाच्या वतीने जाहीर निषेध

माजलगाव । प्रतिनिधी

हल्द्वानी येथे काँग्रेस पक्षाचे नेते मा. राहुल गांधी जी व काँग्रेस अध्यक्ष मा. मल्लिकार्जुन खरगे जी यांच्या जाहीर सभेनंतर कार्यक्रमस्थळी करण्यात आलेले ’शुद्धीकरण’ हे कृत्य अत्यंत निंदनीय, भारतीय संविधानाच्या समानता व बंधुत्वाच्या मूलभूत तत्वांना पायदळी तुडवणारे आणि दलित-वंचित समाजाच्या आत्मसन्मानाला ठेच पोहोचवणारे आहे.

सदरील घटनेच्या निषेधार्थ आज भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, अनुसूचित जाती विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष गौतम पालजी, विभागाचे प्रदेशाध्यक्ष अनिरुद्ध वनकर यांच्या सूचनेनुसार तसेच माजी मंत्री अशोकराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस अनुसूचित जाती विभाग माजलगाव बीड जिल्ह्याच्या वतीने मा. उपविभागीय अधिकारी,



माजलगाव यांना निवेदन देण्यात आले. सदरील निवेदनात हल्द्वानी येथील सदरील ’शुद्धीकरण’ कृत्याचा आम्ही तीव्र शब्दात जाहीर निषेध करतो. तसेच सदरील कृत्यात प्रत्यक्ष सहभागी असलेल्या, त्यास प्रोत्साहन देणाऱ्या व समर्थन करणाऱ्या सर्व संबंधित व्यक्तींविरुद्ध तात्काळ अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधात्मक कायदा १९८९ (सुधारित २०१५) अंतर्गत गुन्हा दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.भविष्यात अशा प्रकारच्या जातीयवादी, भेदभावपूर्ण कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने दक्षता घ्यावी व संविधानाच्या मूल्यांचे संरक्षण करावे अश्या प्रकारे न्याय मागण्या करण्यात आल्या आहेत. निवेदनाची गंभीर दखल घेऊन योग्य त्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत तात्काळ गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. सदरील निवेदन हे काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले असून, सदर निवेदनावर,अशोक कांबळे,हरिभाऊ चाळक,शहराध्यक्ष आफरोज तांबोळी,कृष्णा शिंदे, जिल्हा सचिव सय्यद याकुब, रशिद शेख,पत्रकार अनंत घडसिंगे,संकेत कासार,बळीराम कारके,अजीज चाऊस, फारुख शेख,यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# उस उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिटन ५,२०० रुपये दर द्यावा

## भारतीय किसान संघाच्या महाराष्ट्र प्रांत बैठकीत ठराव; अध्यक्ष बळिराम सोळंके यांची मागणी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

उसाच्या उत्पादन खर्चात सातत्याने वाढ होत असल्याने उस उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिटन ५,२०० रुपये उसदर देण्यात यावा, अशी प्रमुख मागणी भारतीय किसान संघाच्या महाराष्ट्र प्रांताच्या व्यापक बैठकीत करण्यात आली. या संदर्भातील ठराव प्रांताध्यक्ष बळीरामजी सोळंके गुरुजी यांनी बैठकीत मांडला असून तो मंजूर करण्यात आला.

भारतीय किसान संघाची महाराष्ट्र प्रांताची व्यापक बैठक तुळजापूर येथे दि. २९ व ३० ऑगस्ट रोजी पार पडली. या बैठकीत राज्यातील शेतीसमोरील विविध प्रश्नांवर सखोल चर्चा करून शेतकरीहिताचे अनेक महत्त्वपूर्ण ठराव मंजूर करण्यात आले. बैठकीस राज्यातील २३ जिल्ह्यांतील सुमारे ३६० प्रतिनिधी उपस्थित होते. बैठकीच्या प्रारंभी राज्यातील खरीप हंगाम, पर्जन्यमान आणि एकूण शेतीस्थितीचा आढावा घेण्यात आला. राज्यातील अनेक भागांत झालेल्या असमान पावसामुळे निर्माण झालेल्या टंचाईसदृश परिस्थितीची गंभीर दखल घेण्यात आली. ही परिस्थिती दुष्काळात रूपांतरित होण्यापूर्वी शासनाने तातडीने विशेष उपाययोजना जाहीर कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे प्रश्न अधिक संघटितपणे आणि प्रभावीपणे मांडण्यासाठी भारतीय किसान संघाने संघटन विस्तारावर विशेष भर देण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील २५ जिल्ह्यांतील २७८ तालुक्यांमध्ये ३ लाख सभासदांची नोंदणी करण्याबरोबरच ३ हजार ग्राम समित्या स्थापन करण्याचा संकल्प बैठकीत करण्यात आला.

सभासद नोंदणी पूर्ण झाल्यानंतर ग्राम, तालुका, जिल्हा आणि प्रांत




स्तरावर संघटनात्मक निवडणुका घेण्यात येणार असून, त्यानंतर प्रांतस्तरीय अधिवेशन आयोजित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

**बैठकीतील प्रमुख ठराव**

उस उत्पादनाचा वाढता खर्च लक्षात घेऊन उस उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिटन ५,२०० रुपये उसदर देण्यात यावा. राज्यातील टंचाईसदृश परिस्थितीचे दुष्काळात रूपांतर होऊ नये, यासाठी शासनाने तातडीने विशेष उपाययोजना जाहीर कराव्यात. पेट्रोलमध्ये २५ टक्के इथेनॉल मिश्रण तसेच डिझेलमध्ये ५ टक्के आयसोब्युटेनॉल मिश्रण करण्याच्या प्रस्तावाचा केंद्र शासनाने गांभीर्याने विचार करावा. वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करण्याबरोबरच शेतकऱ्यांच्या जीवित व मालमत्तेच्या संरक्षणासाठी आवश्यक कायदेशीर अधिकार शेतकऱ्यांना मिळावेत. गोसेवा आयोग व राज्य शासनाने पुरेशा आर्थिक तरतुदीसह व्यापक देशी गोवंश संवर्धन धोरण राबवावे. अफगाणिस्तानमार्गे होणाऱ्या अवैध चिनी बेदाण्याच्या आयातीवर बंदी घालून देशातील, विशेषतः महाराष्ट्रातील द्राक्ष व बेदाणा उत्पादक शेतकऱ्यांना संरक्षण द्यावे. शेती करणाऱ्या तरुणांच्या विवाहाचा प्रश्न सामाजिक दृष्टिकोनातून हाताळण्याची आवश्यकता असल्याचे मत बैठकीत व्यक्त करण्यात आले. किसान संघाच्या कार्यकर्त्यांनी आपल्या मुलींचे विवाह शेतकरी तरुणांशी करून सामाजिक परिवर्तनात पुढाकार घ्यावा, असा ठरावही मंजूर करण्यात आला. मराठवाड्यातील फळपिकांवर आधारित प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी स्वतंत्र विशेष प्रोत्साहन योजना जाहीर करण्यात यावी. तसेच मराठवाड्यातील सर्व धरणे परस्परांना जोडून शाश्वत सिंचन व्यवस्था निर्माण करण्यासाठी मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाला गती देण्यात यावी, असा महत्त्वपूर्ण ठराव मंजूर करण्यात आला. शेतकरीहिताच्या या सर्व मागण्यांची शासनाने गांभीर्याने दखल घेऊन तातडीने अंमलबजावणी करावी. अन्यथा लोकशाही मार्गाने रस्त्यावर उतरून आंदोलन व संघर्ष करण्याचा इशारा भारतीय किसान संघाने दिला आहे. संघटन विस्ताराच्या माध्यमातून गावपातळीवर अधिकाधिक शेतकऱ्यांना जोडून त्यांच्या प्रश्नांसाठी व्यापक जनआंदोलन उभारण्याचा निर्धारही या बैठकीत व्यक्त करण्यात आला. या बैठकीस भारतीय किसान संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष के. साई रेड्डी, राष्ट्रीय मंत्री बाबूभाई पटेल, महाराष्ट्र प्रांताध्यक्ष बळिराम सोळंके, क्षेत्रीय संघटन मंत्री पद्मश्री डॉ. दादा लाड, प्रांत महामंत्री मदन देशपांडे, मराठवाडा विभागाचे मदनआबा नरवाडे, बैठकीचे संयोजक नितीन घुले यांच्यासह प्रमुख पदाधिकारी व राज्यभरातील प्रतिनिधी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्या हक्कासाठी तीन दशकांचा लढा अखेर यशस्वी!

३० वर्षे मावेजाची प्रतीक्षा ३५ शेतकऱ्यांना दिलासा खात्यावर रक्कम जमा होण्यास सुरुवात | पत्रकार विनोद उगीले यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश | प्रशासन व लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने प्रश्न मार्गी

नळगीर : अतिष शिंदे

लातूर : उदगीर तालुक्यातील नळगीर येथील सुमारे ३५ शेतकऱ्यांच्या शेतीतून साठवण तलावाच्या कॅनलचे खोदकाम करण्यासाठी जलसंधारण विभागाने जमीन संपादित केली होती. महसूल विभागामार्फत जमीन संपादनाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असली, तरी तब्बल ३० वर्षांपासून संबंधित शेतकऱ्यांना त्यांच्या संपादित जमिनीचा मावेजा मिळाला नव्हता. मावेजा न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत होता, तर मावेजाअभावी प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र मिळत नसल्याने त्यांच्या पाल्यांच्या शिक्षण व नोकरीच्या संधींवरही परिणाम होत होता.नळगीरचे सुपुत्र तथा दैनिक राज्य लोकतंत्रच्या लातूर आवृत्तीचे प्रमुख ज्येष्ठ पत्रकार विनोद उगीले यांनी ही बाब गांभीर्याने घेतली. शेतकऱ्यांच्या या दीर्घकाळ प्रलंबित प्रश्नासाठी त्यांनी उदगीर उपविभागीय अधिकारी कार्यालयापासून लातूर, संभाजीनगर तसेच मंत्रालयस्तरापर्यंत सातत्याने पाठपुरावा केला. संबंधित विभागातील अधिकारी व लोकप्रतिनिधींशी समन्वय साधत त्यांनी हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

या पाठपुराव्यास भाजपाचे ओबीसी नेते तथा माजी जिल्हा परिषद सभापती बापूराव राठोड, शिवसेना नेते संजय राठोड, उदगीर उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, जिल्हा जलसंधारण अधिकारी नाईक, तत्कालीन जिल्हा जलसंधारण अधिकारी जावेद पटेल, विजयकुमार मनंठुळे तसेच मंत्रालयातील अधिकारी भगवान कासले व वासुदेव कराड यांचे मोलाचे सहकार्य लाभले.अखेर या प्रयत्नांना यश आले असून, तब्बल तीन दशकांपासून प्रलंबित असलेल्या मावेजा प्रकरणाला आता प्रत्यक्ष गती मिळाली आहे. संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये मावेजाची रक्कम जमा होण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे नळगीरच्या शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.





**सहकार्य करणाऱ्यांचा शेतकऱ्यांकडून सत्कार :** मावेजा मिळण्याचा मार्ग मोकळा झाल्याबद्दल नळगीर येथील शेतकऱ्यांनी मंगळवारी संबंधित अधिकारी व लोकप्रतिनिधींचा येथोचित सत्कार करून त्यांच्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.यावेळी बापूराव राठोड, संजय राठोड, उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, जिल्हा जलसंधारण अधिकारी नाईक, अभियंता काळोजी, विजयकुमार मनंठुळे व तलाठी पठाण यांचा सत्कार करण्यात आला.यासोबतच या प्रश्नासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे पत्रकार विनोद उगीले, तसेच शिरूर अनंतपाळ येथील महेताब शेख, अतुल बिरादार व सुदर्शनदेव कापसे यांनी केलेल्या सहकार्याबद्दलही शेतकऱ्यांनी त्यांचे आभार मानले.यावेळी माजी सरपंच धर्मपाल नादरगे, पांडुरंग किवंडे, माधवराव उगीले, अशोक शेटकार, उत्तम किवंडे, शिवाजीराव भोसले, शिवा उगीले, राजकुमार उगीले, व्यंकट सोमूलवार, योगेश भोसले, गोविंद मोरतळे, माणिक पाटील, बाबुराव उदगीरे, संगमेश्वर बंडे यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

तीन दशकांपासून रखडलेला प्रश्न मार्गी लागल्याने नळगीरच्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अखेर त्यांच्या हक्काचा मावेजा त्यांच्या खात्यावर जमा होऊ लागला आहे.

### मंत्री संजय राठोड यांनी अवघ्या दोन दिवसात प्रश्न लावला मार्गी

नळगीर येथील शेतकऱ्यांच्या संपादित जमिनीच्या मावेजा मागणीचा प्रस्ताव जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्याकडे प्राप्त होतात त्यांनी अवघ्या दोन दिवसात तो मंत्री मंडळाच्या बैठकीत ठेवत त्याला मंजुरी मिळवून घेतली व तसा शासन निर्णयही काढला त्यांनी केलेले सहकार्याबद्दल नळगिरच्या शेतकऱ्यांतून त्यांचे विशेष कौतुक केले जात आहे

## नारळ शेतीतून असे मिळवा शाश्वत उत्पन्न



नारळ हे बहुवार्षिक पीक असून योग्य नियोजन व व्यवस्थापनाने यातून दीर्घकाळ चांगले उत्पन्न मिळते. १. हवामान व जमीन हवामान: उष्ण व दमट हवामान (२०ओउ ते ३२ओउ तापमान) उपयुक्त ठरते. जमीन: उत्तम निचरा होणारी, खोल, रेताड किंवा गाळाची जमीन नारळ शेतीसाठी सर्वोत्तम मानली जाते. जमिनीचा सामू (कि) ५.५ ते ८.० दरम्यान असावा. प्रमुख जातीउंच जाती: बाणवली, प्रताप, वेस्ट कोस्ट टॉल (थउढ). हे झाड आयुष्यमानाने जास्त (६०-८० वर्षे) असते व ते ७ ते ८ वर्षांत फळे देण्यास सुरुवात करते.

ठेंगण्या जाती : चोघट ऑरेंज ड्वार्फ, मलयन यलो ड्वार्फ. ही झाडे ३ ते ४ वर्षांत फळे देतात; मुख्यतः शहाळ्याच्या पाण्याकरिता ही वापरली जातात.लागवड पद्धत : खड्ड्यांचा आकार: १ मीटर ह्न १ मीटर ह्न १ मीटर आकाराचे खड्डे उन्हाळ्यात खणावेत.अंतर: उंच जातींसाठी: ७.५ मीटर ह्न ७.५ मीटर ठेंगण्या जातींसाठी: ६.५ मीटर ह्न ६.५ मीटर खड्डे भरणे: खड्ड्यांत उत्तम शेणखत, वरची सुपीक माती, २ किलो सिंगल सुपर फॉस्फेट आणि ५० ग्रॅम लिंडेन पावडर (वाळवी नियंत्रणासाठी) मिसळून खड्डा भरावा.

४. खत व पाणी व्यवस्थापन : पाणी: झाडाच्या पहिल्या ३ वर्षांत नियमित पाणी देणे आवश्यक आहे. ठिबक सिंचन (ऊेळ खिीीळसरींळेप) सर्वोत्तम पर्याय आहे. खत मात्रा (प्रति झाड दरवर्षी):शेणखत / कंपोस्ट: ५० किलो नत्र (छ): ५०० ग्रॅम (१.१ किलो युरिया)स्फुरद (झ): ३२० ग्रॅम (२ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) पालाश (घ): १२-०० ग्रॅम (२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) ५. आंतरपिके : नारळाच्या बागेत पहिल्या ६ ते ८ वर्षांत सूर्यप्रकाश व्यवस्थित मिळत असल्याने केळी, अननस, आले, हळद, मिरी किंवा मसाला पिके आंतरपिक म्हणून घेऊन अतिरिक्त उत्पन्न मिळवता येते. ६. किडी व रोग नियंत्रण : भुंगा: नियंत्रणासाठी बागेची स्वच्छता ठेवावी आणि एरंडीच्या पेंडीचे सापळे वापरावेत. तांबडा किडा : झाडाला पडलेल्या छिद्रांवर योग्य कीटकनाशकांची फवारणी करावी.कोळी : नारळाच्या कळीवर लिंबोळी तेलाची किंवा शिफारशीत कीटकनाशकांची फवारणी करावी.

## एक महत्त्वाचे नगदी आणि औषधी कंदपीक : सुरण लागवड

सुरण हे एक महत्त्वाचे नगदी आणि औषधी कंदपीक आहे. योग्य नियोजन आणि योग्य जमिनीची निवड केल्यास सुरणाच्या शेतीतून कमी खर्चात चांगले उत्पादन मिळवता येते.१. हवामान आणि माती : हवामान: सुरण पिकासाठी उष्ण आणि दमट हवामान अतिशय पोषक असते.माती: पाण्याचा उत्तम निचरा होणारी, सुपीक, वालुकामय किंवा मध्यम काळी माती सर्वोत्तम मानली जाते. दलदलीच्या किंवा पाणी साचणाऱ्या मातीत कंद सडण्याची भीती असते. मातीचा कि६.० ते ७.५ असावा.

२. लागवडीची वेळ आणि बियाणे (कंद) : लागवडीची वेळ: एप्रिल ते मे महिना (मान्सूनपूर्व) हा सुरण लागवडीसाठी सर्वात योग्य काळ आहे.बियाणे निवड: लागवडीसाठी आदल्या वर्षाचे निरोगी कंद वापरले जातात. साधारण ५०० ग्रॅम ते १ किलो वजनाचे कंदाचे तुकडे (किंवा छोटे कंद) लागवडीसाठी योग्य मानले जातात.

बीजप्रक्रिया: कंद कुजू नयेत म्हणून लागवडीपूर्वी कॉपर ऑक्सिक्लोराईड किंवा बुरशीनाशकाच्या द्रावणात कंद ५-१० मिनिटे बुडवून वाळवून घ्यावेत.

३. लागवड पद्धत आणि अंतर : पद्धत: जमिनीची २-३ वेळा खोल नांगरणी करून ११ फूट किंवा १.५१.५ फूट आकाराचे खड्डे खणावेत.अंतर: दोन ओळींत आणि दोन रोपांत २ ते ३ फूट अंतर ठेवावे.खतांचा वापर: खड्ड्यांमध्ये चांगली कुजलेली शेणखत, कडुनिंबाची पेंड आणि मातीचे मिश्रण भरून मध्यभागी कंद पुरावा.

४. पाणी आणि खत व्यवस्थापन : पाणी: पावसाळ्यात वेगळ्या पाण्याची गरज भासत नाही. मात्र, पावसाने ताण दिल्यास किंवा उन्हाळ्यात १० ते १२ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. खत: लागवडीनंतर २ ते ३ महिन्यांनी झाडाला भर (मातीची प्रणी) देताना सेंद्रिय खते किंवा नत्र-स्फुरद-पालशचा (छझघ) संतुलित डोस द्यावा.

५. काढणी : लागवडीनंतर साधारण ८ ते ९ महिन्यांत (नोव्हेंबर-डिसेंबर) सुरणाची पाने पिवळी पडून वाळू लागतात. पाने पूर्ण वाळल्यानंतर कंद जमिनीतून काळजीपूर्वक उकरून बाहेर काढावेत. प्रति एकर १५ ते २५ टनांपर्यंत उत्पादन मिळू शकते.



## कमी कालावधीत चांगले उत्पन्न देणारे पीक; कांदेपात लागवड

कांदेपात (डीळिपस जपळेप / त्र्िशशप जपळेप) लागवड करणे अतिशय सोपे आणि कमी कालावधीत चांगले उत्पन्न देणारे पीक आहे. भाजीपाल्यासाठी आणि औषधी गुणधर्मांसाठी कांदेपाताला बाजारात नेहमीच चांगली मागणी असते.

हवामान आणि जमीन : हवामान: थंड आणि कोरडे हवामान या पिकासाठी उत्तम मानले जाते. मात्र, योग्य काळजी घेतल्यास हे पीक वर्षभरात कधीही घेता येते.जमीन: मध्यम ते भारी, उत्तम निचरा होणारी आणि सेंद्रिय पदार्थांनी समृद्ध असलेली जमीन (कि६.० ते ७.०) योग्य ठरते.

पूर्वमशागत आणि वाफे तयार करणे : जमीन २-३ वेळा उभ्या-आडव्या नांगरणीने भुसभुशीत करून घ्यावी.शेवटच्या नांगरणीवेळी जमिनीत चांगले कुजलेले शेणखत (१०-१२ टन प्रति एकर) मिसळावे.लागवडीसाठी २ मीटर ह्न ३ मीटर आकाराचे सपाट वाफे किंवा गादीवाफे तयार करावेत.

लागवडीच्या पद्धती कांदेपाताची लागवड प्रामुख्याने दोन पद्धतींनी केली जाते: अ. कांद्यांच्या रोपांद्वारे बियाण्यापासून (कांदा बी/काळा तीळ) रोपवाटी तयार करून २० ते २५ दिवसांची रोपे



पुनर्लागवड केली जातात. अंतर: दोन ओळींत १५ सेमी आणि दोन रोपांत ७-१० सेमी अंतर ठेवावे.ब. छोट्या कांद्यांद्वारे : छोट्या आकाराचे कांदे (तुकडे/गुंटी कांदा) थेट जमिनीत लावून कमी वेळेत कांदेपात मिळवता येते.

अंतर: दोन कांद्यांमध्ये १०-१२ सेमी अंतर ठेवावे.

पाणी आणि खत व्यवस्थापन पाणी व्यवस्थापन:लागवड केल्यानंतर लगेच हलके पाणी द्यावे.जमिनीच्या प्रकारानुसार आणि ऋतूनुसार ५ ते ७ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे.काढणीच्या ५-७ दिवस आधी पाणी देणे थांबवावे.खत व्यवस्थापन:कांदेपात हे पाल्याचे पीक असल्याने नत्राची (छळींीसशप) गरज जास्त असते.लागवडीवेळी: नत्र, स्फुरद आणि पालाश (छझघ) ५०:५०:५० किलो प्रति एकर द्यावे.लागवडीनंतर २० ते २५ दिवसांनी: २५ किलो नत्र (युरिया) प्रति एकर द्यावे.तण नियंत्रण आणि आंतरमशागत

लागवडीनंतर १५ ते २० दिवसांनी पहिली खुरपणी करून तण काढून टाकावे.रोपांच्या मुळांशी मातीची हलकी भर द्यावी, ज्यामुळे कांद्याचा भाग पांढरा आणि मऊ राहण्यास मदत होते.

रोग आणि कीड नियंत्रणकीड: प्रामुख्याने थ्रिप्स (ढहीर्ळीि - फुलकिडे) चा प्रादुर्भाव होतो. यासाठी कडुनिंबाचे तेल (छशशा जळश्र) किंवा योग्य कीटकनाशकाची फवारणी करावी.रोग: तांबएठ-(ठींीं) किंवा करपा. यासाठी बुरशीनाशकाचा वापर करावा. काढणी आणि उत्पन्नकाढणीचा वेळ: लागवडीनंतर ४५ ते ६० दिवसांत कांदेपात काढणीस तयार होते.पद्धत: कांदेपात मुळासकट उपटून काढावी. त्यानंतर मुळांवरील माती धुवून स्वच्छ करावी आणि लहान-लहान जुड्या बांधून बाजारात विकावी.उत्पन्न: योग्य व्यवस्थापन केल्यास प्रति एकर ४० ते ६० क्विंटल कांदेपाताचे उत्पादन मिळते.

## दिन विशेष

### जागतिक दिवस
### आंतरराष्ट्रीय फ्रेंडशिप डे

### महत्वाच्या घटना

३०१ : ३०१ई.पूर्व : जगातील सर्वात जुने प्रजासत्ताक राष्ट्र सॅन मरीनो स्थापित झाले.
१७५२ : अमेरिकेत ग्रेगरीयन कॅलेंडरचा वापर सुरू झाला.
१९१६ : श्रीमती ॲनी बेझंट यांनी 'होमरुल लीग'ची स्थापना केली.
१९२१: बेल्जियम देशांत कम्युनिस्ट पक्षाची स्थापना करण्यात आली.
१९३५: सर मॅल्कम कॅम्पबेल ताशी ३०० मैल पेक्षा जास्त जोरात ऑटोमोबाईल चालवणारे पहिले व्यक्ति झाले.
१९३९: जर्मन सम्राट हिटलर यांच्या पोलंड, ब्रिटन आणि फ्रान्सवर केलेल्या हल्ल्याला प्रती उत्तर म्हणून, सत्ता गाजविलेल्या राष्ट्राच्या दोन्ही मित्रपक्षांनी जर्मनीविरुद्ध युद्धाची घोषणा केली.
१९७१: कतारला स्वातंत्र्य मिळाले.
२००४: भारतीय पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी आणि पाकचे अध्यक्ष परवेझ मुशर्रफ यांच्यात या वर्षाच्या सुरुवातीच्या काळात नाजूक शांतता वाढत असताना, भारत आणि पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्र्यांनी दिल्ली येथे बैठक घेऊन शांततेचा करार केला.
२०१८: उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू यांनी लिहिलेल्या मुव्हिंग ऑन मुव्हिंग फोरवर्ड : ए इयर इन ऑफिस या पुस्तकाचे पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.
२०१९: भारतातील मध्य प्रदेश राज्यातील भोपाळ या शहरात सुरु असलेल्या राष्ट्रीय स्पर्धांमध्ये वरिष्ठ राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत ५० मीटर बटरफ्लाय प्रकारात वीर धवल खाडे व दिव्या सतीजा यांनी राष्ट्रीय विक्रमासह सुवर्णपदक पटकावले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६१७: मुघल सम्राट शाहजहां आणि त्यांची पत्नी मुमताज महल यांची दुसरी मुलगी रोशनारा बेगम यांचा जन्मदिन.
१८५५: पंत महाराज बाळेकुन्द्री – आध्यात्मिक गुरू (मृत्यू: १६ आक्टोबर १९०५)
१८६९: फ्रिट्झ प्रेग्ल – सेंद्रीय पदार्थांच्या पृथ्थक्करणासाठी १९२३ मधील रसायनशास्त्राचा नोबेल पुरस्कार मिळवणारे ऑस्ट्रियन शास्त्रज्ञ (मृत्यू: १३ डिसेंबर १९३०)
१८७५: फर्डिनांड पोर्श – ऑस्ट्रियन वाहन अभियंता (मृत्यू: ३० जानेवारी १९५१)
१९०५: नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ कार्ल डेव्हिड अँडरसनयांचा जन्म.
१९०५: भारतीय राजकारणी, लेखक, पत्रकार आणि स्वातंत्र्यसैनिक कमलापती त्रिपाठी यांचा जन्मदिन.
१९२३: किशन महाराज – संगीत नाटक अकादमी पुरस्कार तसचं पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय शास्त्रीय संगीताच्या बनारस घराण्यातील सुप्रसिद्ध तबला वादक पंडित. तबला सम्राट. बनारस घराण्याचे तबला वादक. वडिलांकडून त्यांनी आपले शिक्षण सुरु केले. (मृत्यू: ४ मे २००८)
१९२३: कृष्णराव तथा 'शाहीर' साबळे – संगीत नाटक अकादमी तसचं पद्मश्री पुरस्कार सन्मानित महाराष्ट्रीयन मराठी शाहीर. 'महाराष्ट्राची लोकधारा' या आपल्या कार्यकमातून लावणी, कोकेवाला (ग्रामीण भागात सारंगीसारखे वाद्य वाजवून देवादिकांची आख्याने गाणारा) या कार्यक्रमाला अफाट लोकप्रियता मिळाली होती (मृत्यू: २० मार्च २०१५)
१९२३: टाको बेल चे संस्थापक ग्लेन बेल यांचा जन्म. (मृत्यू: १६ जानेवारी २०१२)
१९२६: भारतीय बंगाली व हिंदी चित्रपट अभिनेते उत्तम कुमार यांचा जन्मदिन.
१९२७: अरुण कुमार चटर्जी तथा 'उत्तम कुमार' – बंगाली व हिन्दी चित्रपट अभिनेते (मृत्यू: २४ जुलै १९८०)
१९३१: श्याम फडके – नाटककार ('काका किशाचा', 'तीन चोक तेरा', 'राजा नावाचा गुलाम' फेम)
१९३८: नोबेल पारितोषिक विजेते जपानी रसायनशास्त्रज्ञ रायोजी नोयोरी यांचा जन्म.
१९४०: प्यारेलाल रामप्रसाद शर्मा – चित्रपटसृष्टीत चार दशके लोकप्रिय संगीत देणार्या 'लक्ष्मीकांत-प्यारेलाल' या जोडीतील संगीतकार
१९५६: भारतीय अभिनेते आणि दिग्दर्शक जिझ्नु दासगुप्ता यांचा जन्म. (मृत्यू: २१ डिसेंबर २०१२)
१९५७: भारतीय योग गुरु व सद्गुरू नावाने प्रख्यात ईशा फाउंडेशनचे संस्थापकजग्गी वासुदेव यांचा जन्मदिन.
१९६५: अमेरिकन अभिनेता चार्ली शीन यांचा जन्म.
१९७१: भारतीय-अमेरिकन लेखक किरण देसाई यांचा जन्म.
१९७४: भारतीय क्रिकेटपटू राहुल संघवी यांचा जन्म.
१९९२: राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार व पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय कुस्तीपटू महिला साक्षी मलिक यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६५८: इंग्लंडचा राज्यकर्ता ऑलिव्हर क्रॉमवेल यांचे निधन.
१९४८: चेकोस्लोव्हेकियाचे दुसरे राष्ट्राध्यक्ष एडवर्ड बेनेस यांचे निधन.
१९५३: लक्ष्मण तथा 'खाप्रुमामा' पर्वतकर – तबला, घुमट व सारंगीवादक. गोव्यातील 'घुमट' हे तालवाद्य ते अत्यंत कौशल्याने वाजवत. (जन्म: ? ? १८८०)
१९५८: माधव केशव काटदरे – निसर्गकवी (जन्म: ३ डिसेंबर १८९२)
१९६७: अनंत हरी गद्रे तथा समतानंद – वार्ताहर, संपादक, थोर समाजसुधारक आणि नाटिका संप्रदायाचे प्रवर्तक, जाहिरातशास्त्रातील तज्ञ. 'मौज' आणि 'निर्भिड' ही साप्ताहिके त्यांनी सुरू केली. जातीयता निर्मूलनासाठी त्यांनी सहभोजनाचा (त्या काळातील धाडसी) उपक्रम चालवला. (जन्म: १६ आक्टोबर १८९०)
१९९१: अमेरिकन चित्रपट दिग्दर्शक फ्रँक काप्रा यांचे निधन.
२०००: पांडुरंग पुरुषोत्तम शिरोडकर – स्वातंत्र्यसैनिक, गोवा विधानसभेचे पहिले सभापती
२०१४: भारतीय राजकारणी ए. पी. वेंकटेश्वरन यांचे निधन. (जन्म: २ ऑगस्ट १९३०)



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
गुरुवार दि.३ सप्टेंबर २०२६ ५



# हेल्मेट सक्तीच्या पहिल्याच दिवशी ७८७ विना हेल्मेट वाहनचालकांवर कारवाई

## ७ लाख ८७ हजार रुपयांचा दंड ; राष्ट्रीय व राज्य महामार्गावर हेल्मेट सक्तीची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू

लातूर । प्रतिनिधी

लातूर जिल्ह्यात वाढत्या अपघातांना आणि अपघातांमधील जीवितहानीला आळा घालण्यासाठी लातूर पोलिसांकडून राबविण्यात येत असलेल्या हेल्मेट सक्तीच्या मोहिमेची आज, १ सप्टेंबरपासून प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू करण्यात आली. हेल्मेट न वापरणाऱ्या दुचाकीस्वारांविरोधात जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांच्या माध्यमातून राष्ट्रीय महामार्ग तसेच राज्य महामार्गावर धडक कारवाई करण्यात आली. हेल्मेट सक्तीच्या पहिल्याच दिवशी एकूण ७८७ विना हेल्मेट दुचाकीस्वारांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून, एकूण ७ लाख ८७ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.लातूर जिल्ह्यात अपघातांचे वाढते प्रमाण आणि त्यामध्ये होणारी जीवितहानी कमी करण्याच्या उद्देशाने लातूर पोलीस विभागाकडून गेल्या मार्च महिन्यापासून सातत्याने हेल्मेट वापराबाबत जनजागृती करण्यात येत आहे.



विविध माध्यमांतून नागरिकांना हेल्मेटचे महत्त्व पटवून देण्यात आले. पोलीस विभागाकडून वारंवार आवाहन करूनही अपेक्षित प्रमाणात हेल्मेट वापर होत नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर जिल्ह्यात हेल्मेट सक्तीची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला.त्यानुसार आजपासून हेल्मेट सक्तीच्या पहिल्या टप्प्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी राष्ट्रीय महामार्ग आणि राज्य महामार्गावर करण्यात आली. जिल्ह्यातील सर्व संबंधित पोलीस ठाण्यांच्या माध्यमातून विना हेल्मेट दुचाकी चालविणाऱ्या वाहनचालकांची तपासणी करून प्रचलित कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली.

या मोहिमेदरम्यान लातूर पोलिसांकडून केवळ दंडात्मक कारवाईवर भर न देता नागरिकांना हेल्मेट वापरण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. दुचाकीस्वारांनी स्वतःच्या सुरक्षिततेसाठी तसेच आपल्या कुटुंबाच्या सुरक्षित भविष्यासाठी प्रत्येक वेळी हेल्मेटचा वापर करावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले.

वरिष्ठ अधिकाऱ्यांचा प्रत्यक्ष सहभाग: हेल्मेट सक्तीच्या अंमलबजावणीदरम्यान पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या सूचनांनुसार अपर पोलीस अधीक्षक श्री मंगेश चव्हाण, शहर उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री समीरसिंह साळवे, चाकूर उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री मायने तसेच निलंगा उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री विशाल डुमे यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनीही मोहिमेत प्रत्यक्ष सहभाग घेतला. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विविध ठिकाणी वाहनचालकांशी संवाद साधत हेल्मेटचे महत्त्व समजावून सांगितले. दुचाकीस्वारांनी वाहतुकीचे नियम पाळावेत आणि हेल्मेटचा नियमित वापर करावा, यासाठी पोलिसांकडून जनजागृती करण्यात आली.

हेल्मेट सक्तीचा उद्देश दंड वसुली नव्हे, तर जीवितहानी रोखण : हेल्मेट सक्तीमागे केवळ दंड वसूल करणे हा पोलिसांचा उद्देश नसून, रस्ते अपघातांमध्ये होणारी जीवितहानी कमी करणे आणि नागरिकांचे प्राण सुरक्षित ठेवणे हा मुख्य उद्देश आहे. दुचाकी अपघातांमध्ये डोक्याला गंभीर दुखापत होण्याचा धोका मोठा असतो. त्यामुळे दुचाकीस्वारांनी हेल्मेटचा वापर करणे अत्यंत आवश्यक असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. लातूर पोलीस विभागाकडून नागरिकांना नम्र आवाहन करण्यात आले आहे की, हेल्मेट सक्ती ही नागरिकांच्या सुरक्षेसाठी आहे. त्यामुळे पोलिसांच्या कारवाईची वाट न पाहता प्रत्येक दुचाकीस्वाराने स्वतःहून हेल्मेटचा वापर करावा.हेल्मेट सक्तीची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करण्यात येणार असून, पहिल्या टप्प्यात राष्ट्रीय महामार्ग आणि राज्य महामार्गावर कारवाई सुरू करण्यात आली आहे. लातूर जिल्ह्यातील नागरिकांमध्ये शंभर टक्के हेल्मेट वापराची सवय निर्माण होईपर्यंत ही मोहीम सातत्याने सुरू ठेवण्यात येणार असल्याचे पोलीस विभागाकडून सांगण्यात आले आहे. लातूर पोलिसांनी नागरिकांना या उपक्रमात सहकार्य करण्याचे आवाहन करताना, हेल्मेट हे ओझे नसून कुटुंबाचे सुरक्षा कवच आहे, असा संदेश दिला आहे. प्रत्येक दुचाकी प्रवासात हेल्मेटचा वापर करून स्वतःचे आणि आपल्या कुटुंबाचे जीवन सुरक्षित ठेवावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# एपीएमसी व एमआयडीसीतील दुहेरी कर आकारणी रद्द करा-सतीश पंच



जालना। प्रतिनिधी

कृषी उत्पन्न बाजार समिती (एपीएमसी) तसेच एमआयडीसी परिसरातील व्यापारी व गाळेधारकांवर जालना महानगरपालिकेकडून केली जाणारी मालमत्ता कर आकारणी पूर्णपणे बेकायदेशीर व अन्यायकारक असून, ही दुहेरी कर आकारणी त्वरित थांबवावी, अशी ठाम भूमिका जालना व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सतीश पंच यांनी घेतली आहे. तसेच गेल्या तीन वर्षांत वसूल करण्यात आलेला कोट्यवधी रुपयांचा कर व्याजासह परत करण्यात यावा व न्यायालयाच्या निर्णयानुसार कोणताही एकच कर आकारण्यात यावा, या मागणीचे सविस्तर निवेदन जिल्हाधिकारी डॉ. आशिमा मित्तल व मनपाचे सहाय्यक आयुक्त विजय फुलंब्रीकर यांच्याकडे सादर करण्यात आले.

या शिष्टमंडळात जालना व्यापारी महासंघाचे अध्यक्ष तथा कॅटचे राज्य उपाध्यक्ष सतीश पंच, कॅटचे मराठवाडा अध्यक्ष हस्तीमल बंब आणि जालना जिल्हा वकील संघाचे माजी उपाध्यक्ष ड. महेश धनवत यांचा समावेश होता. निवेदनात मुंबई उच्च न्यायालयाने ५ ऑगस्ट २०२६ रोजी दिलेल्या महत्त्वपूर्ण निकालाचा (रिट याचिका क्र. ४२७८/२०१८) तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा हवाला देण्यात आलेला असून त्यानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम (चठढझ), १९६६ च्या कलम १५९-अ सह पहिल्या अनुसूचीच्या खंड ७(१) नुसार, ज्या भागात विशेष नियोजन प्राधिकरण (उदा. एमआयडीसी किंवा बाजार समिती) स्वतः रस्ते, पाणी, वीज, स्वच्छता, सुरक्षा यांसारख्या पायाभूत सुविधा पुरवते व त्यासाठी अधिभार/शुल्क वसूल करते, त्या परिसरातील भूखंड व गाळेधारकांना महानगरपालिकेच्या मालमत्ता करातून पूर्ण सूट मिळते,अशा भागात एकाच वेळी दोन संस्थांकडून 'दुहेरी कर' वसूल करणे कायद्याच्या चौकटीत बसत नाही, असे न्यायालयाचा निकालात नमूद असल्याचे निदर्शनाला आणून देण्यात आले.जोपर्यंत बाजार समिती स्वतः सर्व सोयी-सुविधा पुरवत आहे, तोपर्यंत मनपाने एपीएमसी परिसरातील दुकाने, गोदामे व बांधकामांवर मालमत्ता कर आकारणे व जबरदस्तीची वसुली करणे त्वरित बंद करावे, सन २०२३-२४ ते २०२५-२६ या तीन वर्षांच्या कालावधीत मनपाने व्यापाऱ्यांकडून बेकायदेशीरपणे वसूल केलेली कर वसुलीची संपूर्ण रक्कम संबंधितांना व्याजासह परत करावी, व्यापाऱ्यांना बजावण्यात आलेल्या सर्व कर मागणी नोटीसा व वसुली कारवायांना त्वरित स्थगिती द्यावी, आधी मागण्या या निवेदनात करण्यात आल्या आहेत. एपीएमसी असो की एमआयडीसी, जिथे संबंधित प्राधिकरण स्वतः पायाभूत सुविधा पुरवून शुल्क घेते, तिथे महानगरपालिकेने कर आकारणे हा व्यापाऱ्यांवर थेट अन्याय आहे. उच्च न्यायालयाच्या स्पष्ट आदेशानंतर आता मनपाने ही दुहेरी कर प्रणाली त्वरित बंद करावी; अन्यथा व्यापारी महासंघाला न्यायालयीन लढा उभारावा लागेल, असा इशारा सतीश पंच यांनी दिला आहे.

# ओबीसी आरक्षण बचावसाठी प्रल्हाद कीर्तने यांच्या उपोषणाकडे प्रशासन आणि लोकप्रतिनिधीचे दुर्लक्ष

पाथर्डी । प्रतिनिधी

महाराष्ट्रात ओबीसी विरुद्ध मराठा असा आरक्षणाचा वाद गेल्या तीन वर्षापासून पेटलेला असताना पुन्हा एकदा आरक्षणाच्या मुद्द्यावरून मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण दिल्याने ओबीसी प्रवर्गातून मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र व आरक्षण देऊ नये खोटी तसेच खाडाखोड बनावट कुणबी प्रमाणपत्र बेकायदेशीर देणाऱ्या अधिकाऱ्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत ओबीसींचे मूळ २७% आरक्षणावर गदा येऊ नये तसेच मागील वर्षी २ सप्टेंबर २०२५ चा घटनाबाह्य शासन निर्णय रद्द करावा व ओबीसी चे हक्क न्याय आणि मूळ आरक्षण अबाधित राहावे या मागण्यासाठी कीर्तनवाडी येथील ओबीसी आंदोलक प्रल्हाद कीर्तने यांनी बेमुदत आमरण उपोषण सुरू करून पाच दिवस उलटून गेले आहेत तरीसुद्धा लोकप्रतिनिधी



आमदार मोनिका राजळे यांच्यासह जिल्हाधिकारी व सरकार प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने ओबीसी समाजामध्ये संतापाची लाट निर्माण झाली आहे असा आरोप भगवानगड परिसरातील ओबीसी आंदोलकांनी केला आहे कीर्तनवाडी येथील मारुती मंदिरासमोर प्रल्हाद कीर्तने यांनी ओबीसी आरक्षण बचाव मोहिमेसाठी व ओबीसींचे न्याय हक्क व घटनात्मक अधिकार सुरक्षित रहावे यासाठी चार वेळा आमरण उपोषण केलं असून त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व ओबीसी नेते छगन भुजबळ धनंजय मुंडे पंकजा मुंडे गोपीचंद पडळकर महादेव जानकर विजय वडेट्टीवार लक्ष्मण हाके जय भगवान महासंघाचे बाळासाहेब सानप एड.मंगेश ससाने नवनाथ वाघमारे यांना भगवानगड परिसराच्या पायथ्याशी असणाऱ्या कीर्तनवाडी येथे आमंत्रित केले आहे प्रल्हाद कीर्तने यांच्या उपोषण स्थळी भगवानगड परिसरातील अनेक गावातून ओबीसी आंदोलक समर्थन देत आहेत यावेळी ग्रामपंचायत सदस्य अजिनाथ कीर्तने लहू दराडे नवनाथ कीर्तने अनिल खेडकर विक्रम खेडकर नवनाथ कीर्तने नारायण कीर्तने दीपक कीर्तने सागर कीर्तने तसेच अनेक ओबीसी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मराठा समाज इडब्ल्यूएस इसीबीसी आणि आता ओबीसी मधून बॅक डोअर खोटी कुणबी प्रमाणपत्र काढून मूळ ओबीसीच्या आरक्षणावर गदा आणत आहे भारतीय राज्यघटनेच्या संविधानानुसार एकाच मराठा जातीला तीन-तीन आरक्षणाचा शैक्षणिक सामाजिक व राजकीय लाभ होत असल्याने ओबीसी यांचे राजकीय सामाजिक शैक्षणिक अस्तित्व संपल्यात जमा असल्याने शासनाने २ सप्टेंबर २०२५ चा शासन निर्णय रद्द करून खोटी कुणबी प्रमाणपत्र देणे थांबवावे व मूळ २७% ओबीसींचे आरक्षण अबाधित ठेवावे अन्यथा भगवानगडाच्या पायथ्याला विद्रोही आंदोलन पाहायला मिळेल - प्रल्हाद कीर्तने

( ओबीसी आंदोलक)

# बंद घरे-दुकानांवर चोरट्यांची नजर-पोलिस निरीक्षक भंडे

अशोकराव वाकळे पाटील

चाकूर : चाकूर शहरासह तालुक्यात चोरी, घरफोडी व लुटमारीच्या घटना टाळण्यासाठी नागरिकांनी सतर्क राहून आपल्या मालमत्तेच्या सुरक्षेसाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन चाकूर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक बालाजीराव भंडे यांनी केले आहे. सध्या पावसाचे प्रमाण कमी झाले असून, बंद दुकाने, घरे तसेच एकाकी ठिकाणांची पाहणी करून चोरट्यांकडून चोरीच्या घटना घडण्याची शक्यता आहे. त्यामुळे व्यापारी, दुकानदार आणि नागरिकांनी सुरक्षेकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.दुकान बंद करताना रोख रक्कम, दागिने अथवा अन्य मौल्यवान वस्तू दुकानात ठेवू नयेत. दिवसभरातील रोकड सुरक्षित ठिकाणी ठेवावी किंवा बँकेत जमा करावी. दुकानाच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. हे कॅमेरे केवळ दुकानाच्या शटरपुरते मर्यादित न ठेवता दुकानासमोरील रस्ता व परिसर स्पष्टपणे दिसेल, अशा पद्धतीने बसवावेत. त्यामुळे संशयास्पद व्यक्ती, वाहनांची हालचाल आणि अन्य घटनांचे चित्रीकरण मिळण्यास मदत होईल.



घरात कोणी नसताना रोख रक्कम, दागिने किंवा मौल्यवान वस्तू ठेवणे टाळावे. बाहेरगावी जाताना घराची माहिती विश्वासू शेजाऱ्यांना देऊन घराकडे लक्ष ठेवण्यास सांगावे. तसेच आपण प्रवासाला जात असल्याची माहिती सोशल मीडियावर सार्वजनिकपणे शेअर करू नये. बंद घरांना चोरटे लक्ष्य करण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी विशेष दक्षता घ्यावी.शेतकरी व शेतमजुरांनीही शेतावर जाताना रोख रक्कम, दागिने किंवा मौल्यवान वस्तू सोबत नेणे टाळावे. अनोळखी व्यक्तीची पूर्ण ओळख पटल्याशिवाय तिला घरात प्रवेश देऊ नये. घरात एकट्या महिला किंवा वयोवृद्ध व्यक्ती असल्यास त्यांच्या सुरक्षेबाबतही विशेष काळजी घ्यावी. संशयास्पद व्यक्ती किंवा हालचाल आढळल्यास नागरिकांनी स्वतःहून कारवाई न करता तत्काळ पोलिसांना माहिती द्यावी. आपत्कालीन परिस्थितीत डायल ११२ या क्रमांकावर संपर्क साधावा. नागरिकांची छोटीशी खबरदारीही मोठी घटना टाळण्यास उपयुक्त ठरू शकते. पोलिसांना वेळेवर माहिती मिळाल्यास संशयास्पद हालचालींवर तत्काळ कारवाई करणे शक्य होते. 'सतर्क राहा, सुरक्षित राहा आणि संशयास्पद हालचालींची माहिती पोलिसांना द्या,' असे आवाहन पोलिस निरीक्षक बालाजीराव भंडे यांनी केले.

## जाहिर प्रगटन

**मा. श्री. रफीक ए. शेख, सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमाक: १४१६/२०२६**

**(मार्फत विधिज्ञ: ॲड बी.एन. तावरे )**

अर्जदार :- १. मोहन पि. कुंडलीक रसाळ, वय ६४ वर्षे, धंदा शेती, २. राजेंद्र पि. कुंडलीक रसाळ, वय ५४ वर्षे, धंदा शेती वरील रा. मांजरसुंबा ता.जि.बीड ३. शकुंतला भ्र. बाबुराव शिंदे, वय ६२ वर्षे, धंदा घरकाम, रा.अंथरवणपिंप्री ता.जि.बीड ४. गोदावरी भ्र. मधुकर बहिर, वय ६५ वर्षे, धंदा घरकाम, रा. बैंक कॉलनी, अहमदपुर ता. अहमदपुर जि लातुर ५. सविता भ्र. भास्कर जाधव वय ५७ वर्षे, धंदा घरकाम, रा. अबिंका चौक, कॅनॉल रोड, बीड, ता.जि.बीड,

विरुध्द गैरअर्जदार :-

१ नवनाथ पि. कुंडलीक रसाळ वय ६८ वर्षे, धंदा शेती, २ सखाराम पि. कुंडलीक रसाळ वय ५९ वर्षे,वरील रा. मांजरसुंबा ता.जि.बीड धंदा - शेती, प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी मयत नामे लक्ष्मीबाई भ्र. कुडंलीक रसाळ हे दिनांक ०८/०२/२०२६ रोजी मौजे मांजरसुंबा ता.जि.बीड, येथे मयत झालेले असुन अर्जदार क्र. १,२ व गैरअर्जदार क्र १ व २ हे मयताचे मुले असुन अर्जदार क्र ३ ते ५ हया मयताच्या विवाहीत मुली आहेत. मयताचे पती यापूर्वीच मयत झालेले आहेत.अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे.अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक:- ०२/०९/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली. पुढील तारीखः ०७/१०/२०२६.

आदेशावरुन,
स्वाक्षरीत/-
**अधिक्षक,**
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

# हजाराहून अधिक महिलांनी आ.लोणीकरांना बांधली राखी

## लाडक्या बहिणींच्या पाठीशी सदैव ठाम; बहिणींच्या विश्वासाचे रक्षण हीच माझी जबाबदारी - आ. लोणीकर

जालना । प्रतिनिधी

भारतीय जनता पार्टी मंठा तालुका व संजय गांधी निराधार योजना समितीच्या वतीने रक्षाबंधनानिमित्त 'एक राखी भाऊंसाठी' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन मंठा येथील वैशाली मंगल कार्यालयात करण्यात आले होते. यावेळी मंठा तालुक्यातील नेर शेवलीसह विविध भागांतील एक हजारांहून अधिक महिलांनी आमदार बबनराव लोणीकर यांना राखी बांधून औक्षण केले. भगिनींच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला भावनिक आणि आपुलकीचे स्वरूप प्राप्त झाले. मोठ्या संख्येने उपस्थित महिलांनी आपल्या लाडक्या भावाप्रती प्रेम, विश्वास आणि जिव्हाळा व्यक्त केला. या अनोख्या सोहळ्याने भाऊ-बहिणींच्या नात्यातील पवित्र बंध अधिक दृढ झाल्याचे चित्र दिसून आले.यावेळी बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की, रक्षाबंधन हा केवळ एक सण नसून भाऊ-बहिणींच्या निस्वार्थ प्रेमाचा, विश्वासाचा आणि जिव्हाळ्याचा पवित्र उत्सव आहे. बहिण भावाच्या मनगटावर राखी बांधते तेव्हा तिच्या मनात भावाबद्दलचा विश्वास आणि संरक्षणाची अपेक्षा असते. आज एक हजारांहून अधिक भगिनींनी राखी बांधून व्यक्त केलेले प्रेम माझ्यासाठी अत्यंत भावनिक आणि प्रेरणादायी आहे. या राखीच्या माध्यमातून मिळालेला विश्वास जपणे ही माझी मोठी जबाबदारी आहे. बहिणींच्या प्रेमाला आणि



विश्वासाला सदैव पात्र राहण्याचा प्रयत्न करीन, असे त्यांनी सांगितले.

मतदारसंघातील प्रत्येक महिला ही आपल्या कुटुंबातील सदस्याप्रमाणे असल्याची भावना व्यक्त करत आमदार लोणीकर म्हणाले की, आपल्या लाडक्या बहिणींच्या सुख-दुःखात सहभागी राहणे ही आपली जबाबदारी आहे. त्यांच्या अडचणीच्या काळात केवळ शब्दांनी नव्हे, तर प्रत्यक्ष मदत आणि आवश्यक पाठपुराव्याद्वारे त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहू. ग्रामीण भागातील महिला, निराधार भगिनी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील महिलांच्या प्रश्नांना प्राधान्य दिले जाईल. त्यांच्या समस्या शासनदरबारी प्रभावीपणे मांडून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.महिला सक्षमीकरण हा समाजाच्या सर्वांगीण विकासाचा महत्त्वपूर्ण आधार असल्याचे सांगताना आमदार लोणीकर यांनी महिलांना आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या सक्षम करण्याची गरज अधोरेखित केली. महिलांच्या स्वावलंबनासाठी शासनाच्या विविध योजना आणि उपक्रमांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न केले जातील. महिलांना शिक्षण, रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देतानाच त्यांच्या आरोग्य व सुरक्षिततेच्या प्रश्नांनाही प्राधान्य दिले जाईल. सक्षम महिला म्हणजे सक्षम कुटुंब आणि सक्षम समाज, या विचाराने महिला सक्षमीकरणासाठी अधिक प्रभावीपणे काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.'लाडकी बहीण' ही केवळ एका योजनेपुरती मर्यादित संकल्पना नसून महिलांच्या सन्मान आणि सुरक्षिततेप्रती असलेल्या सामाजिक बांधिलकीचे प्रतीक आहे, असेही आमदार लोणीकर म्हणाले. मतदारसंघातील प्रत्येक बहिणीला सन्मानाने आणि स्वाभिमानाने जगता यावे, यासाठी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. महिलांच्या हक्कांशी संबंधित प्रश्न असोत किंवा त्यांच्या कुटुंबाच्या विकासाशी निगडित अडचणी, त्यासाठी आपण नेहमी उपलब्ध राहू. मतदारसंघातील महिलांनी दाखविलेल्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.वैशाली मंगल कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमात पारंपरिक पद्धतीने औक्षण करून महिलांनी आमदार बबनराव लोणीकर यांच्या मनगटावर राखी बांधली. रक्षाबंधनाच्या पवित्र सणानिमित्त आयोजित या उपक्रमामुळे परिसरात उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. विविध भागांतील महिलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. उपस्थित भगिनींनी आमदार लोणीकर यांच्याप्रती असलेला विश्वास आणि आपुलकी व्यक्त केली. 'एक राखी भाऊंसाठी' या उपक्रमाने लोकप्रतिनिधी आणि मतदारसंघातील भगिनींमधील भावनिक नाते अधिक दृढ झाल्याचे दिसून आले.कार्यक्रमाच्या शेवटी आमदार बबनराव लोणीकर यांनी सर्व भगिनींचे मनःपूर्वक आभार मानले. आज मनगटावर बांधलेल्या प्रत्येक राखीमुळे मतदारसंघातील बहिणींच्या विश्वासाची जबाबदारी अधिक दृढ झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. महिलांचा सन्मान, सुरक्षा, स्वावलंबन आणि सर्वांगीण विकासासाठी आपले प्रयत्न सातत्याने सुरू राहतील, असे त्यांनी सांगितले. मतदारसंघातील लाडक्या बहिणींच्या प्रत्येक योग्य प्रश्नासाठी आणि अडचणीच्या वेळी आपण ठामपणे त्यांच्या पाठीशी उभे राहू, अशी ग्वाही त्यांनी दिली. प्रेम, विश्वास, संरक्षणाची भावना आणि महिला सक्षमीकरणाचा संदेश देणारा हा रक्षाबंधन सोहळा मंठा येथे संस्मरणीय ठरला.

यावेळी गणेशराव खवणे नितीन राठोड वैजनाथ बोराडे अरुण वाघमारे प्रसादराव बोराडे शरद मोरे बाज हा पठाण जे के कुरेशी विठ्ठलराव काळे शिवाजीराव जाधव आपले आनंद जाधव विलास घोडके प्रल्हाद सरकटे दीपक बोराडे जितेंद्र सरकटे माऊली गोडगे ए.टी. चव्हाण शिवशंकर डोईफोडे परमेश्वर शिंदे प्रसादराव गडदे रावसाहेब बाहेकर कैलास चव्हाण राजभाऊ खराबे नागेशराव घारे अमोल मोरे यमुना दवणे जयश्री पवार सविता देशमाने छाया चव्हाण सुनीता वाघमारे जरीना खान जय अवचार बेबीताई जोशी नीता राठोड निता गवळी निता सदावर्ते आशामती गायकवाड आशाबाई राठोड रामकिसन बोडके भगवान लहाने सुनिता सरकटे कल्याण चव्हाण सुभाष बागल अविनाश राठोड तानाजी शेंडगे रामकिसन मुसळे एनडी दवणे प्रसादराव गडदे उद्धवराव कोंडके पंकज राठोड दिगंबर आवचार नितीन सरकटे शरद पाटील बंडू नाना खरात अमोल मोरे संतोष बोराडे वसंतराव बागल पांडुरंग काळे भागवत पोटे राजभाऊ खराबे श्री देव खरात सोपान वायाळ सुनील कांगणे नितीन चाटे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

# धारूर पोलीस स्टेशनचे राठोड यांनी एफआयआरमध्ये फेरफार केल्याबद्दल एसपी कॉवत यांच्याकडे तक्रार

## सीसीटीव्ही फुटेज तपासून न्याय द्या अन्यथा जिल्हाधिकार्यालयासमोर उपोषण करणार- बाळकृष्ण अंडील

वडवणी । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील पहाडी पारगाव येथील शेतकरी बाळकृष्ण अंडील यांनी धारूर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गु.र.नं. ४२/२०२६ मधील फिर्यादीमध्ये फेरफार करून बदल करण्यात आल्याचा गंभीर आरोप पोलीस तपासी अंमलदार राठोड एस.ए. यांच्यावर केला आहे. याप्रकरणी त्यांनी बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत तसेच केजचे डीवायएसपी वेंकटराम यांच्याकडे लेखी तक्रार देऊन धारूर पोलीस ठाण्यातील संबंधित सीसीटीव्ही फुटेज तपासून वस्तुस्थिती समोर आणावी आणि आपल्याला न्याय द्यावा अशी मागणी केली आहे.

पहाडी पारगाव शिवारातील बैलगाडी जाण्याच्या रस्त्यावर जेसीबीच्या साह्याने दगड-माती लोटून रस्ता बंद करण्यावरून वाद झाला होता. या घटनेनंतर १४ फेब्रुवारी २०२६ रोजी धारूर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ४२/२०२६ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला होता .

त्यामध्ये नोटीसवर नमूद असलेले १८९(२) हे कलम बदलून एफआयआरमध्ये ११८(१) करण्यात आले, भांडणाची वेळ सकाळी ९.३० ते १०.३० ऐवजी १०.३० ते ११:०० अशी करण्यात आली.आरोपींचा क्रम बदलण्यात आला तसेच फिर्यादीच्या मूळ फिर्यादीतील तपशीलातही बदल करण्यात आल्याचे




म्हटले आहे.

तसेच महाराष्ट्र पोलीस 'सर्विस फॉर सिटीझन' पोर्टलवर २० मार्च २०२६ पर्यंत सदर एफआयआर ऑनलाइन करण्यात आलेला नव्हता. फिर्यादीने विधी तज्ज्ञांचा सल्ला घेऊन तपासी अंमलदार राठोड यांच्याशी आर्थिक देवाणघेवाण करून संगनमताने फिर्यादीत बदल केल्याचा गंभीर आरोप बाळकृष्ण अंडील यांनी तक्रारीत केला आहे या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक असल्याचे असे त्यांचे म्हणणे आहे.

**सीसीटीव्ही फुटेज तपासण्याची मागणी**

या प्रकरणातील सत्य परिस्थिती सीसीटीव्ही फुटेजच्या माध्यमातून स्पष्ट होऊ शकते, असा दावा अंडील यांनी केला आहे. धारूर पोलीस ठाण्यातील फिर्याद नोंदविण्याच्या ठिकाणी असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे १४ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १२ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंतचे तसेच २० मार्च २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी १२ वाजेपर्यंतचे फुटेज तपासावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.या फुटेजमधून फिर्याद नोंदविण्याची प्रक्रिया, संबंधित व्यक्तींची उपस्थिती तसेच नोंदीमध्ये कथितरीत्या झालेले बदल याबाबत वस्तुस्थिती समोर येऊ शकते असे त्यांचे म्हणणे आहे.

**तीन महिने उलटूनही चौकशी पूर्ण नसल्याचा दावा**

बाळकृष्ण अंडील यांनी सांगितले की, बीड एसपी कार्यालयाकडून धारूर पोलीस ठाण्याला चौकशी करून प्रकरण निकाली काढण्याचे आदेश देण्यात आले असल्याचे त्यांना सांगण्यात आले. मात्र तक्रार करून सुमारे तीन महिने ◀◀ पान ३ वर

# जुगार आणि दारूविक्रीविरुद्ध पोलिसांची धडक कारवाई २४ जणांवर गुन्हे, ७.६६ लाखांचा मुद्देमाल जप्त

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील अवैध जुगार, मटका, सट्टा आणि अवैध दारूविक्रीविरुद्ध सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक भारत पांढरे यांच्या पथकाने विविध पोलीस ठाण्यांच्या हद्दीत छापे टाकून एकूण २४ जणांविरुद्ध गुन्हे दाखल केले असून, त्यांच्याकडून रोख रक्कम, वाहने, मोबाईल आणि दारू असा एकूण ७ लाख ६६ हजार १६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



१ सप्टेंबर रोजी रात्री ११:३० वाजेच्या सुमारास पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीतील हिरालाल चौक येथील मारुती मंदिराच्या पाठीमागील मोकळ्या जागेत सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पथकाने छापा टाकला. या कारवाईत १४ जण रंगेहात जुगार खेळताना मिळून आले. त्यांच्याकडून रोख रक्कम आणि मोबाईल फोन असा एकूण ३ लाख ४२ हजार ४४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

१ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४:३० वाजता अमळनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील डोंगरकिन्ही येथील एका हॉटेलमध्ये जुगार सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पंचांसमक्ष टाकलेल्या छाप्यात ९ जण जुगार खेळताना आढळले. त्यांच्या ताब्यातून रोख रक्कम, मोबाईल आणि वाहने असा एकूण ४ लाख १० हजार ६३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अमळनेर पोलीस ठाणे हद्दीतील डोंगरकिन्ही परिसरात अवैधरीत्या देशी व विदेशी दारू विक्री करणाऱ्या एका व्यक्तीवर कारवाई करण्यात आली. ◀◀ पान ३ वर

# मनोज जरांगे यांचे उपोषण सोडविण्याबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा -आ.सोळंके

माजलगाव । प्रतिनिधी

अंतरवली सराटी येथे मनोज दादा जरांगे पाटील यांचे मागील तीन दिवसांपासून उपोषण सुरू आहे.यापूर्वी झालेल्या विविध आंदोलनांच्या माध्यमातून मराठा समाजाच्या मागण्या शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आल्या असून,त्यातील काही मागण्यांबाबत शासनस्तरावर निर्णय घेण्यात आले आहेत.अद्याप पर्यंत त्याचे ठोस अंमलबजावणी झाली नाही.



सद्यस्थितीत पुन्हा उपोषण करण्याची परिस्थिती निर्माण होणे ही बाब त्यांच्या प्रकृतीच्या दृष्टीने चिंताजनक आहे. त्यामुळे शासनाने सदर आंदोलनाची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित मागण्यांबाबत आवश्यक त्या कायदेशीर व प्रशासकीय बाबींची पूर्तता करून सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा आ.प्रकाश सोळंके यांनी व्यक्त केली आहे.

मराठा समाजाचा राज्याच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासामध्ये महत्त्वपूर्ण सहभाग राहिला आहे. समाजातील मोठा घटक शेती व्यवसायावर अवलंबून असून, अल्पभूधारकता, शेती उत्पन्नातील अनिश्चितता, वाढता उत्पादन खर्च तसेच उच्च शिक्षणाचा वाढता खर्च यामुळे अनेक कुटुंबांसमोर आर्थिक अडचणी निर्माण होत आहेत. ◀◀ पान ३ वर

# वृद्ध इसमाचे १ लाख रुपये हिसकावून नेले

**दोन अनोळखी इसमांकडून मोटारसायकलवरून येत वृद्धाची लूट; माजलगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल**

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील जुन्या बसस्थानक परिसराकडून मांठ्याकडे जाणाऱ्या रस्त्यालगत एका ६६ वर्षीय निवृत्त कर्मचाऱ्याकडील तब्बल १ लाख १० हजार रुपये काळ्या रंगाच्या मोटारसायकलवरून आलेल्या दोन अनोळखी इसमांनी हिसकावून नेल्याची घटना सोमवार,दि. ३१ ऑगस्ट रोजी दुपारी घडली.या घटनेमुळे शहरात खळबळ उडाली आहे.

यासंदर्भात पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अंबादास धोंडिबा अर्जुने (वय ६६, व्यवसाय निवृत्त शिपाई, पाटबंधारे विभाग, रा. चिंचगव्हाण, ता. माजलगाव) हे दि ३१ ऑगस्ट सोमवार रोजी दुपारी सुमारे १२.२० वाजता जुन्या बसस्थानकाच्या उत्तरेकडून मोंढ्याकडे जाणाऱ्या रस्त्यालगत होते. यावेळी काळ्या रंगाच्या मोटारसायकलवरून आलेल्या दोन अनोळखी इसमांनी त्यांच्या जवळील रोख रक्कम हिसकावून नेली. चोरून नेलेल्या रकमेतील ५०० रुपयांच्या २०० नोटा आणि १०० रुपयांच्या १०० नोटा, अशी एकूण १ लाख १० हजार रुपयांची रोकड असल्याची माहिती आहे. या प्रकरणी माजलगाव शहर पोलिस ठाण्यात गु.र.क्र. २८७/२०२६, कलम ३०९ (४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी अनोळखी आरोपींचा शोध सुरू केला आहे. पोलिस उपनिरीक्षक संदीप राठोड हे पुढील तपास करीत आहेत.

# शिवरस्ता ते तिकांडे-शिंदे वस्तीचा शेतरस्ता महसुल अभिलेख व गावनकाशात नोंद होणार

शिरुर । प्रतिनिधी

हिवरसिगा शीव हद्दी पासुन पुर्वेकडे जाणारा पारंपरिक वहिवाटीतील शेतरस्ता महसुल अभिलेख व भूमीअभिलेख विभागाच्या गावनकाशात नोंद करण्यासाठी शिवराम राऊत याच्या सह सहभागी गटातील शेतकऱ्यांच्या मागणीस्तव मा. श्री. सुरेशजी घोळवे (तहसिलदार शिरूर) यांच्या आदेशानुसार श्री. शहादेव सानप ( मडळ अधिकारी ) श्री. गणेश बडे ( ग्राममहसुल अधिकारी )श्री. विश्वाभर शिंदे (ग्रामरस्ता समिती ) माऊली शिंदे



( ग्रामरस्ता समिती) श्री.शिवराम राऊत (अध्यक्ष शिवश्री कृषिमडळ) श्री. भरत सातपुते ( महसुल सेवक) यांच्या उपस्थिती मध्ये प्रत्यक्ष जायमोका पाहणी करून पारपारिक वहिवाटीतील शेतरस्ता अदाजे नऊशे मीटर पेक्षा अधिक लाब व चौदा फुट रूद आसणारा शेतरस्ता पाहणी करून सहभागी शेतकऱ्यांच्या समोर पचनामा करण्यात आला. सदरिल शेतरस्ता हा मौ. हिवरसिगा सज्जातील गट क्र. १३९ च्या उत्तरेकडील बाधावरुन ७ फूट व गट क्र. १३८,१४० च्या दक्षिण बाजू बाधालगत ७ फूट ङ्गसमान क्षेत्रातून पूर्व पश्चिमेकडून अदाजे ९०० मी. पेक्षा अधिक लाब रस्ता प्रत्यक्ष वहिवाटित आहे. याचा महसुल अभिलेखाच्या इतर हक्कात नोद करण्यासाठी सर्व शेतकऱ्यांनी सहमती पंचा समक्ष सहमती दर्शवत स्वाक्षरी देऊन एक स्तुत उपक्रम उपूर्णत्वास जाऊन शेतकऱ्यांना शेती वहिवाट करणे, शेतमाल वाहतुक, औजारे व इतर शेतीउपयोगासाठी या शेतरस्त्याचा अनेक वर्षापासून होणारा उपयोग हा अधिकृत नोद होणार आसल्याने शेतकरी समाधानी आहेत.ङ्गतसेच हा शेतरस्ता भचमीअभिलेख विभागातील गाव नकाशात समाविष्ट करण्यासाठी अवश्यकत्या कागदपत्रासह या पूर्वीच मा. अधिक्षक महोदय मा. उप अधिक्षक महोदय भूमी अभिलेख शिरूर यांना प्रस्ताव सादर करण्यात आला आसुन त्या प्रमाणे लवकरच ◀◀ पान ३ वर

# नाळवंडी येथे नऊ वर्षांच्या चिमरडीवर बलात्कार

**बालिकेवरील अत्याचाराच्या निषेधार्थ नाळवंडीत बंद, संतापाचा उद्रेक; नराधम आरोपीला नागरिकांनी दिला चोप**

पाटोदा । प्रतिनिधी

तालुक्यातील नाळवंडी येथे दहा वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार झाल्याच्या धक्कादायक घटनेने संपूर्ण परिसर हादरला आहे. निष्पाप बालिकेवर झालेल्या या अमानुष कृत्यामुळे गावकऱ्यांमध्ये प्रचंड संताप असून, घटनेच्या निषेधार्थ आणि दोषींवर कठोरात कठोर कारवाई करण्याच्या मागणीसाठी आज डोंगरकिन्ही,नाळवंडीमध्ये कडकडीत बंद पुकारण्यात येऊन नाळवंडी येथे एका विशेष जाहीर निषेध सभा घेण्यात



आली.दरम्यान नराधम आरोपीला नागरिकांनी बेदम चोप दिला. यामध्ये आरोपी जखमी झाला असून त्याच्यावर जिल्हा रूग्णालयात पोलिस बंदोबस्तात उपचार सुर आहेत. या प्रकरणात अंमळनेर (ता. पाटोदा) पोलिस ठाण्यात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे.

या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करत गावकऱ्यांनी दोषींवर कठोरात कठोर कारवाई करावी, अशी ठाम भूमिका घेतली आहे. आरोपींना कायद्याच्या कचाट्यातून कोणत्याही परिस्थितीत सुटका मिळता मिळता कामा नये, अशी मागणी होत आहे. डोंगरकिन्ही नाळवंडी बंदमधून प्रशासनाला स्पष्ट संदेश देण्यात आला आहे. बालिकांवरील अत्याचार खपवून घेतला जाणार नाही. या प्रकरणाची तातडीने आणि निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच पीडित बालिकेला पूर्ण संरक्षण आणि न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी गावकऱ्यांनी केली आहे. नाळवंडी येथिल चिमुरडी जवळच ◀◀ पान ३ वर

### प्रत्येक सप्ताहात हजेरी होती आरोपीची

आरोपी बबन काळे सराईत गुन्हे प्रवृतीचा इसम असल्याचे समजते तर तीन बायकाचा दादला असल्याचे समजते.परिसरातील प्रत्येक गावातील अखंड हरिनाम सप्ताहात व दिंडी सोहळ्यात भालदार चोपदार म्हणुन हजेरी लावणारा हा आरोपी इतका नीच प्रवृत्तीचा निघाल्याने परिसरात संतापाचा उद्रेक झाला आहे.

# श्री गजानन नागरी सहकारी बँकेच्या शिरपेचात मानाचा तुरा; 'सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कारा'ने गौरव

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य नागरी सहकारी बँक फेडरेशन, मुंबई यांच्या वतीने देण्यात येणारा 'सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार २०२६' श्री गजानन नागरी सहकारी बँक लि., बीडला प्राप्त झाला आहे. बँकेच्या कार्याची दखल घेत मिळालेल्या या पुरस्कारामुळे बीडच्या सहकार क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.श्री गजानन नागरी सहकारी बँकेची मुहूर्तमेढ रोवताना स्व. केशरबाई क्षीरसागर उर्फ काकू यांनी पाहिलेले सहकार आणि सर्वसामान्यांच्या आर्थिक उन्नतीचे स्वप्न आज बँकेच्या यशस्वी वाटचालीतून साकार होताना दिसत आहे. त्यांच्या विचारांची आणि समाजाभिमुख कार्याची प्रेरणा बँकेच्या वाटचालीला कायम मार्गदर्शक ठरत आहे.बँकेचे अध्यक्ष माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली बँक सातत्याने प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहे. ग्राहकांचा विश्वास, पारदर्शक कारभार आणि गुणवत्तापूर्ण सेवा यामुळे बँकेने सहकार क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.या यशामागे बँकेचे अध्यक्ष उपाध्यक्ष व संचालक मंडळ, अधिकारी, कर्मचारी, खातेदार, सभासद आणि ग्राहकांचे मोलाचे योगदान आहे. सर्वांच्या एकजुटीच्या प्रयत्नातून मिळालेला हा पुरस्कार बँकेशी जोडलेल्या प्रत्येक घटकाच्या विश्वासाचा सन्मान मानला जात आहे.स्व. केशरबाई क्षीरसागर उर्फ काकू यांच्या समाजाभिमुख विचारांची प्रेरणा आणि जयदत्त क्षीरसागर यांच्या सक्षम मार्गदर्शनाची सांगड घालत श्री गजानन नागरी सहकारी बँक प्रगतीची नवी शिखरे गाठत आहे. मिळालेला 'सर्वोत्कृष्ट बँक पुरस्कार २०२६' हा बँकेच्या पुढील वाटचालीसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल अध्यक्ष जयदत्त क्षीरसागर, संचालक मंडळ,अधिकारी, कर्मचारी,खातेदार, सभासद आणि ग्राहकांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा 'सहाय्यता निधी'चा मदतीचा हात

## आ. सुरेश धस यांच्या माध्यमातून पुन्हा गरजू रुग्णांना लाखोंचा आधार! गरजूंना चार रुग्णांना आर्थिक मदत

## महाआरोग्य शिबिरातून मोफत बायपास शस्त्रक्रिया, तर दिनानाथ मंगेशकर रुग्णालयात ८७ हजारांची सवलत

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी विधानसभा मतदारसंघातील गरजू रुग्णांना वैद्यकीय उपचारांसाठी मदत मिळवून देण्यासाठी आ. सुरेश धस यांच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न सुरू असून, पुन्हा एकदा अनेक रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील मुख्यमंत्री सहायता निधीतून आष्टी तालुक्यासह परिसरातील चार रुग्णांच्या वैद्यकीय उपचारांसाठी आर्थिक मदत मंजूर करण्यात यश आले आहे.

गांधणवाडी, हरिनारायण आष्टा येथील ठकुबाई पठाडे यांच्या वैद्यकीय उपचारांसाठी ७० हजार रुपये मंजूर झाले आहेत. तसेच मुख्यमंत्री सहायता निधीतून देवळाली येथील सार्थक मोहिते यांना ५० हजार रुपये, वाळुंज येथील कवीता सोले यांना ५० हजार रुपये, तर जामखेड तालुक्यातील सितपूर येथील अनिकेत मंडलिक यांना ६० हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत.

महाआरोग्य शिबिरातून बायपास शस्त्रक्रिया मोफत



दरम्यान, महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून सोलापूरवाडी येथील भाऊसाहेब बापू वायाळ यांच्यावर साईदीप हॉस्पिटल, अहमदनगर येथे बायपास शस्त्रक्रिया मोफत करण्यात आली. गावचे सरपंच मनोज थोरवे यांनी याबाबत पूर्वकल्पना दिल्यानंतर संबंधित हॉस्पिटलमधील डॉक्टर व स्टाफशी चर्चा करून वायाळ यांच्या शस्त्रक्रियेची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

दिनानाथ मंगेशकर रुग्णालयात ८७ हजारांची सवलत

सालेवडगाव येथील अक्षय जपकर यांच्या बहिणी श्रीमती निकीता अंबादास मांढरे, रा. चिंचोडी (पा.) यांच्यावर दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय उपचार सुरू होते. या उपचारांच्या बिलामध्ये आ. सुरेश धस यांच्या पत्राद्वारे एकूण ८७ हजार रुपयांची सवलत मिळवून देण्यात यश आले. उपचारानंतर रात्री ११ वाजता त्यांना डिस्चार्ज देण्यात आला. सदर रुग्ण सालेवडगावचे सरपंच अशोक दहातोंडे यांच्या माध्यमातून मदतीसाठी आले होते.गरजू रुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधीतून आर्थिक मदत मिळवून देण्यासोबतच महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून मोफत उपचार व शस्त्रक्रियांची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आ. सुरेश धस यांच्या माध्यमातून सुरू असलेल्या प्रयत्नांमुळे रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांना मोठा आर्थिक आधार मिळत आहे.

### कै.अन्नपूर्णा अब्दागिरे यांचे निधन

दिंद्रुड: येथील अन्नपूर्णा विश्वनाथ अब्दागिरे यांचे बुधवारी



पहाटे अल्पशा आजाराने निधन झाले, सायंकाळी ४ वाजता त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात दोन मुली १ विवाहित मुलगा, नातवंडे असा परिवार आहे.माजलगाव तालुका वैद्यकीय अधिकारी मधुकर घुबडे यांच्या अत्या व शेतीनिष्ठ शेतकरी चंद्रकांत अब्दागिरे यांच्या त्या आई होत्या.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26